# ॥ चैतन्य लहरी ॥

सन १९९५-९६ क्र.९ व १०

"सन २००० पर्यंत आपल्याकडे खूप सहजयोगी जगांत सर्वत्र आढळतील. एकदा आपली संख्या वाढू लागली की खूप लोक उड्या घेतील. मानवी स्वभावच तसा आहे. तुम्ही पहाल की लोक आपल्याकडे आपली संख्या वाढेपर्यंत वळणार नाहीत पण एकदा आपली संख्या वाढली की लोक पटापट येऊ लागतील."

श्री आदिशक्ती पूजा, ९-६-९६

- श्री माताजी निर्मला देवी

# श्री आदिशक्ति पूजा

## प.पू.श्री.माताजी निर्मला देवींचे भाषण

## (सारांश) कबेला : १-६-९६

कुंडलिनी ही आदिशक्तिचे तुमच्यामधील प्रतिबिंब आहे ही आदिशक्तीची व आदिकुण्डलिनीची पूजा आहे असंही आपण म्हणू शकतो. या जगामध्ये एवढंच नव्हे तर सर्व विश्वांमध्ये जे काही निर्माण होत असते ते सर्व या आदिशक्तिचे कार्य आहे.

पुष्कळ लोक मानतात की ईश्वर एकच आहे. हे खरं आहे. परमेश्वर हाच एक देव आहे, पण त्याला त्याच्या शक्त्या आहेत आणि त्या एकाद्या जीवामध्ये स्थापित करून तो आपल्या स्वरूपाचा अविष्कार करत असतो. म्हणून प्रथम त्याने काय केले तर आदिशक्ती साकार केली, तिची निर्मिती होत असतांना जो नाद झाला त्यालाच आपण ओम् (ॐ), लोगांस वगैरे म्हणतो. हाच आदि-स्वर. म्हणजे अ ऊ म् (AUM) या तीन शक्ती निर्माण झाल्या. आदिशक्ती ही परमेश्वराची इच्छाशक्ति आहे. ही इच्छा परमेश्वाच्या कल्पनेतुन, स्वतःला व्यक्त करण्याच्या संकल्पनेतून, आपले प्रतिबिंब निर्माण करावयाच्या संकल्पनेतून निर्माण होते. मी असंही म्हणेन की परमेश्वर आपल्या एकटेपणाला कंटाळला म्हणून त्याने भागीदार म्हणून आदिशक्ति निर्माण केली जिच्याकडून त्याला आपल्या इच्छा साकार करता येतील. अशा तऱ्हेने ही शक्ति परमेश्वरापासून अलग झाली आणि परमेश्वराची करुणा निर्मितीची त्याची इच्छा तिला अंगीकृत झाल्या.

संस्कृतमध्ये "चिद्-विलास" असा शब्द आहे. ह्यालाच आदिशक्तीचा आनंद म्हणता येईल. चित् म्हणजे लक्ष, चित्ताला स्वतःचाच आनंद असतो आणि तो आनंद साकार करण्यासाठी तिनें सृष्टि निर्माण केली. तिने पृथ्वीमाता निर्माण केली. निसर्ग निर्माण केला. सर्व पशू निर्माण केले, मानव निर्माण केले आणि तिनेच सहजयोगी निर्माण केले. अशा तऱ्हेने ही निर्मिती घडून आली.

आंता कुणी असं म्हणेल की तिनें एकदमच मानव कां नाही निर्माण केला. ती परमेश्वराची कल्पना होती. फक्त मानव त्याला काहीही न सांगता निर्माण करावयाचा, एक वेगळा आणि इतर पशुंपासुन निराळा व चांगला प्राणी निर्माण करायचा पण आदिशक्ती ' आई ' असल्यामुळे या इच्छेला साकार करण्याची तिची वेगळी पध्दत होती. तिला वाटेल की परमेश्वराचे रुप दिसेल. त्याची प्रतिमा दिसेल त्याच्या कार्यांची प्रचीती येईल असे आरसे तयार करावे. आणि म्हणून उत्क्रांतीचा हा दीर्घ प्रवास सुरु झाला. उत्क्रांतीची ही प्रतिक्रिया अशीच व्हावयास हवी होती कारण माणसांना आपला मूळ स्त्रोत ओळखणं आवश्यक होते. आपण निसर्गापासुनच आलेलो आहोत हे आपल्याला कळले पाहिजे. निसर्गालासुध्दा आपण भूमातेपासुन निर्माण झालो हे कळले पाहिजे. भूमातेची स्वतःची कुण्डलिनी आहे. ती नुसती निर्जीव माती नाही तर ती जाणते, विचार करते, ती समजते आणि ती नियंत्रण पण करते. तुम्ही निसर्ग नीट पाहिला तर दिसेल प्रत्येक वृक्षाला त्याच्या स्वतःच्या मर्यादा आहेत. विशिष्ट झाडावर विशिष्ट फळेच येतात. हे सर्व कसे होते? यांचे नियंत्रण कोण करते व कसे होते? आपली पृथ्वी सध्यापेक्षा जास्त फिरत असती तर आपल्याला जन्मही मिळाला नसता. हा वेग जर कमी असतां तरीही हे सर्व घटित होऊ शकले नसते. म्हणून सारी योजना तयार केली गेली. पृथ्वी सुर्याभोवती विशिष्ट वेगाने फिरेल आणि त्यामुळे वेगवेगळे ऋतु तयार होतील अशी सुंदर योजना आखली गेली. म्हणूनच या परमचैतन्य शक्तीला, जी आदिशक्तीची शक्ती आहे. तिला ऋतंभरा प्रज्ञा असंही म्हणतात. हीच शक्ती सर्व जिवंत कार्य व निर्मिती कार्य करते व सर्व व्यवस्था करते. मानवी अहंकारामुळे आपण समजतो की आपणच सर्व करतो. निर्मिती करतो. बाकी

सर्व सोडून द्या पण आपण एक साधा धुळीचा कणही निर्माण करु शकत नाही. जे जे निर्माण झाले आहे त्याच्यापैकीच काहींचा संयोग घडवून एकत्रित करुन आपण काहीतरी निर्माण करु शकतो. ही सर्व रचना आपल्या आवाक्यापलीकडची आहे. आपण काहीच निर्माण करु शकत नाही. आपण जे निर्माण केले असं समजतो तो भ्रम आहे. उदा. सोन्याची काही वस्तू केली तरी मुळांत ते सोनेच आहे, लाकडापासुन कांही बनवले तरी ते लाकूडच राहते. सगळ्या वस्तूंमध्ये हेच तत्व आहे. तुम्ही कुठेही जन्माला आलात, कुठल्याही देशांत जन्मला, तुमची संस्कृति कुठलीही असली तरी सर्व माणसेच ना? मुळांत तुम्ही सर्व एकच आहांत. तुम्ही सारे एकसारखे हसता किंवा एकसारखे रडता. मी कुणालाही हातांतून रडताना पाहिले नाही किंवा बोटांतून कुणाला अश्रू आल्याचे पाहिले नाही. म्हणून प्रत्येकाने हे समजून घ्यायला हवे की आपण सर्व जण जीवनाच्या एका समान तत्वामध्ये बांधलेले आहोत. आदिशक्तीने आपल्या सर्व जीवांना ज्या एका तत्वामध्ये बनवले आहे ते तत्व म्हणजे आपल्या सर्वांमध्ये ही कुण्डलिनी आहे. सर्व मानव प्राण्यामध्ये ही कुण्डलिनी आहे, पशुमध्ये पण ती आहे पण ती इतक्या प्रगत स्थितीला नसते, तिचे स्वरुप पूर्ण कुण्डलिनीसारखे नसल्यामुळे ती जागृत करता येत नाही; पण मानवामध्ये ती परमेश्वराशी संपर्क साधण्याइतकी उन्नत स्थितीला आलेली आहे. आपल्यामधील परमेश्वरी शक्तीच्या अवस्थेला आलेली आहे. आदिकुण्डलिनीचे प्रतिबिंब या स्वरुपाला आली आहे, म्हणूनच या कलियुगामध्ये तिचे जागरण सहज होऊ शकते. हेच सर्व माणसांमधील समान तत्व आहे. म्हणून आपण सर्व माणसांबरोबर, मग ते कोणत्याही देशाचे असोत, कोणत्याही राष्ट्राचे, कोणत्याही वर्णाचे असोत आदराचे संबंध राखले पाहिजेत कारण आपल्या सर्वांमध्ये कुण्डलिनी आहे.

तुमच्यासारखे लोक जागृत झाले, आत्मसाक्षात्कार मिळून प्रकाशित झाले. सर्व काही आदिमाचा चिद्‌विलास आहे हे सर्व जेंव्हा तुम्ही जाणता तेंव्हा तुम्हालाही ते एक लीला व आनंद असल्याचे समजते. मग तुम्हाला पूर्ण अध्यात्मिक उन्नती साध्य झाल्यावर तुमचे काय होणार? तुम्हाला कसं काय वाटणार? तुम्ही जीवन कसे व्यतीत करणार? हा प्रश्न तुम्हा लोकांनी अनेकदा विचारला आहे पण तुम्ही जेंव्हा प्रश्न करता तेंव्हा तुम्ही त्या स्थितीला नसता हे ध्यानांत घ्या, कारण एकदां तिथे पोचल्यावर प्रश्नच उरत नाहींत.

दुसरी गोष्ट तुमच्या बाबतीत घडून येते ती म्हणजे तुम्ही फक्त एक जिवंत अस्तित्व होऊन जाता आणि त्या अवस्थेमध्ये परमेश्वराचे गुण तुमच्यामधून व्यतीत होतात. परमेश्वराने आपल्या शक्तीचा आविष्कार पूर्वीपण केला होता. प्रत्येक धर्मामध्ये अशा त-हेचे अनेक लोक झाले ज्यांचे जीवन परमेश्वरासमान अलौकिक होते. हजारों वर्षापूर्वीही हे झाले. कोलंबियामध्ये मी काही शिल्पाकृति पाहिल्या ज्यांच्यात साडेतीन वेटोळ्यांची कुण्डलिनी दिसली, अशा अनेक कृति सापडल्या व ज्यांच्यात साडेतीन वेटोळी म्हणजेच कुण्डलिनी दर्शविली होती. आपल्यामधील कुण्डलिनीचे अस्तित्व सिध्द झालेले तुम्ही अनुभवले आहे, या शक्तीला तुम्ही प्रत्यक्ष जाणले आहे. आपण उन्नतीच्या मध्य-मार्गातून चढलो की काय होते हे पण तुम्हाला समजले आहे. आदिमायेचा अंश असलेली हीच कुण्डलीनी तुम्हाला तुमच्याच हातांच्या बोटावर तुम्ही कुठें चुकत आहांत ते दाखवते, तुमच्यांत काय कमी आहे, तुम्हाला काय त्रास आहे हे सर्व सांगते.

प्रकाशांत आल्यावर, संत झाल्यामुळे इतरांपेक्षा उच्च अवस्थेला आल्यानंतर तुम्ही हे नीट ठामपणे लक्षांत घेतले पाहिजे, नुसते मनाने नाहीं तर अगदी हृदयापासुन की तुम्हाला ईश्वरी शक्तीच्या चैतन्य लहरी मिळाल्या आणि त्यांच्याकडूनच तुम्हाला तुम्ही कोण आहांत, कुठे आहात, कुठे काय प्रश्न आहे हे सर्व तुम्हाला समजते. तुम्ही कुठेही असलात तरी. उदा. जेरुसलेमला गेलेल्या कांही लोकांबरोबर मी बोलले तर ते म्हणाले "माताजी, त्या ठिकाणी सर्वत्र चैतन्य भरभरुन वहात होते" किंवा छिंदवाडयाला गेलेला एक माणूस पोचल्यावर सांगू लागला "माताजींचे घर शोधणं अगदी सोपे आहे, चैतन्यलहरींमधून मला ते सहज सांपडेल" पुढे म्हणाला "स्टेशनवर पोचल्यावर प्लॅटफॉर्मवर उतरतांच मी उडया मारायला लागलो, सगळीकडे फक्त चैतन्यच भरले आहे, मी माताजींच्या घरी कसं पोचणार?" मग तो खाली बसला आणि विचार करु लागला " माताजींचे जन्मस्थान मी कसें शोधुन काढणार?" तो बसूनच राहिला, नंतर थोडया वेळाने त्याला शुक्र तारा दिसला, तो त्याच्या दिशेने चालायला लागला आणि मग सरळ त्या ठिकाणी पोचला असे त्याने सांगितले.

ही सर्व योजना सुसूत्रपणे चालवली जाते, कसंतरी वेडेवाकडे हे केलेलं नाही. उदा. एखाद्या वृक्ष पहा, त्याच्या प्रत्येक पाना-पानाला सूर्यप्रकाश मिळेल अशी रचना आहे. निसर्गामध्ये तुम्ही पहाल तर सर्वच कांही सुरळीतपणे व्यवस्थितपणे व सुंदर रीतीने चाललेले दिसेल. आपण माणसेच निसर्ग बिघडवतो

कारण आपल्याला समजतच नाही की आपण या निसर्गापासुनच जन्माला आलो आहोत आणि म्हणून आपण त्याचा आदर ठेवला पाहिजे. मी बरेच वेळा सांगितले आहे की माणूस भूगर्भातील वेगवेगळया, कार्बन इ. द्रव्यापासून कसा जन्माला आला. या सर्वांमधून आपल्यावर केवढी मोठी जबाबदारी आहे हे आपल्याला लक्षात घ्यायला हवे. या सर्व कार्याला अनेक हजार वर्षे लागली आणि आतां तुम्ही आपल्या स्वतःच्या स्वरुपाच्या स्थितीला आला आहात. तुम्ही स्वतःला जाणलं आहे. उत्क्रांतीच्या प्रक्रियेमधील ही फार मोठी भरारी आहे. उत्क्रांतीची ही प्रक्रिया फार पुरातन काळापासून चालत आली. आदिशक्तीची व आदिकुण्डलिनीच्या पुजेला फार महत्व आहे. तुम्ही संत कसे झाला हे तुम्ही कधींच समजूं शकणार नाही. आपल्यामध्येच ही सर्व चक्रे आहेत आणि कुण्डलिनीच्या जागरणांतून व उत्थानातूनच ती स्वच्छ होतात आणि मग ही कुण्डलिनी तुमच्या हाताच्या बोटांवर जाणवते हे ज्ञान जोपर्यंत तुमच्यामधे खोलवर ठामपणे रुजत नाही तोपर्यंत तुम्ही मधेमधे तुमच्या परिपूर्ण अवस्थेला पोचण्याच्या मार्गातुन विचलित होण्याची शक्यता असते. मी बघितले आहे की सहजयोगांत आलेल्या कांही लोकांना अर्धवट सहजयोगी भेटतात आणि मग मनोविकृतीमुळे ही असं कसं, ते असं का असे वाद सुरु होतात. सहजयोगी असुनही तो असा कसा वागू शकतो ? लोक अनेक तऱ्हेने परमेश्वरी शक्तीबरोबर संबंध जोडतात. मी सुरूवातीलाच सांगितले की परमेश्वराला एकलेपणा वाटू लागला म्हणून त्याने आदिशक्तीला निर्माण केले आणि तिने या साऱ्या विश्वाची निर्मिती केली. पण हेही खरं आहे की तुम्ही जसे शोधणारे साधक आहांत तसेच परमात्मा तुम्हांला शोधत आहे. तुम्हाला परमात्म्यानेच बुध्दी दिली आहे ही साधी गोष्ट तुम्हाला समजली तर तुमच्या सत्य-शोधनाला (साधनेला) नक्कीच यश येणार. त्याच शक्तीने तुम्हाला सुज्ञता दिली, तुम्ही जे कुणी आहात ते तिनेच दिले आहे. तुमच्यापाशी जे काही आहे ती ते तुमच्या कुण्डलिनीनेच, तुमच्या कुण्डलिनीच्या मा - शक्तीने दिले आहे आणि म्हणून तिला समाधान होईल याची काळजी घेणं महत्वाचं आहे आणि कशामुळे तिला समाधान होते हे पण तुम्ही लक्ष ठेऊन पाहिले पाहिजे. साक्षात्कारी आत्मा आणि परमात्मा यांचा संबंधच असा आहे की त्याला तुम्ही आनंदी असल्याचाच आनंद होतो. आपण असंही म्हणूं शकतो की परमात्मा तुम्हाला सुख देतो आणि तुम्ही सुखी झाल्याचे पाहून परमात्मा पण सुखी होतो. हे नातंच असं आहे, जसे सूर्य आणि सूर्याचे किरण किंवा चंद्र आणि चंद्राचा प्रकाश. हे अतुट नाते आहे, एकजिनसी व एकमेकांत अंतर्भूत आहे की त्याच्यामुळे तुम्हाला स्वतःवर आणि स्वतःच्या प्रगतीवर पूर्ण नियंत्रण ठेवता येते. पुष्कळ प्रकारे याचे वर्णन असेच केले गेले की तुम्ही शरणागत व्हायला पाहिजे. एकादा माणूस सुरा दाखवुन समोर ठाकल्यावर कुणी त्याला शरण जाईल पण तो माणूस निघून गेल्याबरोबर तोही सुरा काढून त्यालाच ठार करायला तयार होईल. त्या शरणागतीला अर्थ नाही, कारण ती जबरदस्तीतुन झालेली असते, अशाच शरणागतीमुळे उलट प्रश्नच निर्माण होतात कारण त्यावेळी प्रतिक्रिया होत असते ; पण परमेश्वराकडे शरण जाण्यांत फारच आनंद असतो, जसं मीठ पाण्यांत किंवा समुद्रात आल्यावर आपोआपच विरघळून जाते. ही विरघळण्याची प्रवृत्ति आनंददायक असते. तुमच्या अंतर्यामी अशी तीव्र भावना असली, इतके एकरूपपणे तुम्ही परमेश्वरासमोर याल तेव्हां तुम्ही त्या परमात्म्याच्या समुद्रात विरघळून जाल आणि मग तुमचे जीवन प्रेम व करूणामय होऊन जाते आणि त्याचा अपरंपार आनंद मिळतो.

पुष्कळ लोक मला सांगतात की माताजी क्षमा करणे फार अवघड आहे. पण मला वाटते की एकाद्याला क्षमा न करणे फार क्लेशदायक आहे. क्षमा करण्यामधे खरं तर फार आनंद आहे, तुम्ही क्षमा केल्याबरोबर परम चैतन्याच्या हातात सर्व सोपवले जाते आणि ते तुमची काळजी घेत राहते. कुणी तुम्हाला त्रास देऊ शकणार नाही. पण प्रथम तुम्ही परमेश्वराला शरण जायला हवे. हेच क्षमा करणे. दुसऱ्याला काही शिक्षा करायचा विचारच करु नका किंवा दुसऱ्याच्या विरुध्द काही करु नका. कारण एकदा परमात्म्याकडे सर्व सोपवल्यावर जे करायला हवे ते तोच करणारा होतो आणि तेही इतक्या सुंदर तऱ्हेने की ते कसं घडून येते हे पाहण्यांतही आनंद मिळतो. आदिशक्तीची ही परमेश्वराची शक्ति सर्व धर्मात सांगितली आहे. इस्लाममध्ये त्याला "रूह" म्हणतात बायबलमध्ये त्याचे वर्णन All Pervading Power (सर्वव्यापी शक्ति) असं केले आहे, त्याला Alak (अलक) म्हणजे जे डोळ्यांना दिसत नाही, "निरंजन" म्हणजे जे कुठल्याही आसक्तीपलीकडचे आहे, असे शब्द पण वापरले जातात. या सगळ्यांचा अर्थ म्हणजे परमात्म्याची शक्ति हीच आहे. लोकांनी त्याच्याबद्दल ऐकले होते, त्याची भजने गायली होती पण दुर्दैवाने कुणाला ती जाणवली नव्हती. आणि जाणीव झाली तरी ती दुसऱ्याला कशी द्यायची हेही माहीत नव्हते. म्हणून त्याच्याबद्दल ते जे काही बोलले किंवा सांगितले त्या फक्त कथाच किंवा विचित्र घटना ठरल्या. ज्यांना ते जाणवले त्यांच्या सांगण्यावर कुणाचा विश्वास बसला नाही. आता सुदैवाने तुम्हां सर्वांना ती जाणवल्यामुळे ही शक्ति खरोखरच आहे ही

गोष्ट सर्वमान्य झाली आहे. तुम्हाला त्याची जाणीव झाली आहे म्हणून त्याबद्दल तुमची खात्री आहे आणि ती जाणवल्यानंतरच आनंदही तुम्हाला माहीत झाला आहे. दुसरी व्यक्ति तुम्हांला जे सांगते ते खरं आहे की नाही हे तुम्ही या परमचैतन्य लहरीमधून ओळखू शकतां. आदिशक्तिकडूनच तुम्हाला ते समजते. आता एकाधाने तुमचे काही नुकसान केले, तर आता तुम्ही म्हणाल की माताजी त्याला क्षमा केली तर त्याने खरोखरच नुकसान केले असल्यामुळे त्याला खोटं म्हणता येणार नाही आणि तरीही मी क्षमा केली तर माझे नुकसान झाले नाही असे मला मानावे लागेल. हा विचार येणे स्वाभाविक आहे. पण तुम्हाला आश्चर्य वाटेल ते हे की तुम्ही तरीही क्षमाच करणार. तुम्ही क्षमा केली काय किंवा नाही काय, प्रत्यक्षात तुम्ही स्वतः काहीच करत नाही. हेच सत्य आहे. म्हणजे करुणा म्हणून तुम्ही क्षमा केली तर करुणा हेच सत्य ठरते. ही करुणाच तुम्हाला सत्यापर्यंत नेते, परम सत्य म्हणून जे काही तुम्ही जाणता ते परमशक्तीच्या करुणेमधुनच होऊ शकते. काही वेळा लोक म्हणतात की माताजी आम्ही व्हायब्रेशन्स पाहिल्या आणि आम्हांला वाटले की असं होईल पण तरीही ते झालं नाही, काही बिघडलं नाही, काय व्हायचे ते झाले, तुम्ही व्हायब्रेशन्य बघितल्या, व्हायब्रेशन्सवर विचारुन त्याप्रमाणे तुम्ही वागलात एवढंच ते तसं होणार की नाही ही वेगळी गोष्ट, कारण ते तसं व्हायचे नव्हते. काहीतरी नाट्यमय चालत असते. हाच चिद्‌विलास - परमात्म्याच्या चित्ताचा आनंद. हा खेळ चालतच असतो, तुम्ही जर ही लीला पाहू शकला तर तुम्हाला त्रास वाटणार नाही. हा खेळ कसा चालतो, कसा चालवला जातो वगैरेची काळजी तुम्हाला करायला नको. या खेळामधून परमात्म्याचं कार्य कसं घडून येते एवढंच तुम्ही पहायचे. तुम्ही सर्वांनी अनेक चमत्कार घडलेले पाहिले आहेत. "माताजी, हा चमत्कार घडला, तो चमत्कार पाहिला आणि ही सर्व परमेश्वरी लीलाच आहे" एकदा तुमची श्रध्दा प्रकाशित झाली की मग एरवी महत्वाच्या वाटणाऱ्या आयुष्यांतील गोष्टींची तुम्हाला काळजी वाटत नाही. जर जमले तर उत्तमच, नाही जमले तरी उत्तम. तुम्हाला आत्मसाक्षात्कार झाला म्हणजे सर्व जग तुमच्या पायाशी लोळण घेणार आहे असं समजू नका. त्याची काय जरुर ? हा सर्व खेळ आहे व आदिशक्तिचा चिद्‌विलास आहे. साक्षीभावाने तुम्ही हे पाहू शकतात. तुमची आत्मिक उन्नति होऊन तुम्ही परम-शक्तीच्या जवळ येता आणि कालान्तराने त्याच शक्तत्तीमध्ये सामावून जाता. हे विरघळून जाणे घडून यायला हवं म्हणून आदिशक्तीच्या या पूजेला फार महत्त्व आहे. आदिशक्तीने हा अवतार धारण नसता केला तर हे घडून आलेच नसते. ते तसं एरवी शक्य नव्हते कारण त्या क्रियेमध्ये मानवप्राण्यांच्या सर्व चित्रविचित्र प्रवृत्तींना व मानवी जीवनाच्या सर्व अंगांना सामावून घ्यायचे जरुर होते, ते अवतरण अस असायला हवे होते की, ते पूर्णपणे लक्षात घेणारे, नुसती त्याची शारीरिक, मानसिक, भावनिक किंवा बौध्दिक किंवा त्यांच्या विशिष्ट अधिकार इ. सर्व काही विचार एकत्रिपणे बघणारे हवे होते. अगदी जवळून आतून-बाहेरुन - खरं तर अंतरंगातून सर्व माणसे सारखीच असतात. काही जास्त संवेदनशील असतात आणि गंभीरपणे शोध घेणारे असतात. काही तितके प्रामाणिकपणे साधनेच्या मागे नसतात तर काहींना हा शोधच करायला नको असतो. पण ही सत्यशोधनाची इच्छाही आदिशक्तीकडूनच तुम्हाला मिळालेली असते.

असं झालं की उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक मासा समुद्राच्या जो तिची जणू आईच - आणि त्याच्या नंतर दहा - बारा मासे बाहेर आले. मग त्यानंतर प्रचंड संख्येने येऊ लागले. तुमची उत्क्रांती अशाच तऱ्हेने झाली. आता लोकसंख्या खूप वाढली आहे, संत जॉनने सांगितलेल्या आकड्याच्याही पुढे गेली आहे, असू दे, अस असावं की ही फार सुपीक जमीने आहे. सुपीक काळ आहे, म्हणून या कलियुगातला अधिकाधिक लोक अध्यात्माकडे वळत आहेत. हा या कार्याला उत्तम समय आहे, काल मी तुमचे नाटक पाहिले. ते सर्व मी स्वतः आधीच पाहिले आहे आणि त्या वेळेला मला प्रश्न पडायचा की या एवढ्या लोकांचे कसं होणार ? ते अध्यात्माकडे कसे वळणार ? सध्याच्या प्रगत काळामध्ये ज्या ज्या तऱ्हेतऱ्हेच्या आकर्षक गोष्टी दिसतात त्याचा तुम्ही त्रास वाटून घेऊ नका. कारण ते तसेच व्हायला हवे. कारण ते सर्व एक नाट्य आहे आणि तुम्ही खात्री बाळगून रहा की यातुनच एक चांगली घटना, इतक्या सुंदर तऱ्हेने घडून येणार आहे की त्यातही सगळीकडे तुम्हाला परमात्माच नजरेस येईल आणि त्यांच्यात या सर्व वेकार गोष्टी तुमचे कण्डिशनिंग, अहंकार सर्व काही विरघळून जाईल. सन २००० पर्यंत आपल्याकडे खूप सहजयोगी जगांत सर्वत्र आढळतील. एकदा आपली संख्या वाढू लागली की खूप लोक उड्या घेतील. मानवी स्वभावच तसा आहे. तुम्ही पहाल की लोक आपल्याकडे आपली संख्या वाढेपर्यंत वळणार नाहीत पण एकदा आपली संख्या वाढली की लोक पटापट येऊ लागतील. लोक म्हणतात, माताजी, आम्ही परमेश्वरी साम्राज्यातला आनंद उपभोगतो पण इतरांचे काय ? तेही घडणारच आहे पण तुमचं चित्त इतरांना या आनन्द व करुणेच्या सागरांत कसे सामावून घेणार इकडे असू दे. तुम्हाला तुमच्या करुणेमधूनच शक्ति

मिळणार आहे. मिळत राहीली याचे तुम्हालाच आश्चर्य होईल. तुमच्या करुणामय वागणुकीने जास्त - जास्त लोक आनंदाच्या सागरात येऊन विरघळून जात असल्याचे दिसले की तुमची ती करुणाच तुम्हाला जेजे करणे जरुरीचे आहे ते करण्याची शक्ति देईल. तुम्ही इतर फालतू कामे करणे सोडून द्याल आणि इतरेजनांचे कल्याण करण्याच्या कामाला तुम्ही सर्व काही वाहून घ्याल. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे सर्व करत असतानाच तुमची स्वतःची अध्यात्मिक वाढ होईल. मी असंही म्हणेन की पाण्यांत मीठ जसजसे विरघळते तसतशी त्याची पातळी वाढत जाते. त्याच पध्दतीने जसजशी सहजयोग्यांची संख्या वाढत जाईल तसतशी ही परमचैतन्याची कार्यान्विता वाढत जाईल. आता त्याचे कार्य दिसून यायला लागलेच आहे. पण आणखी लोक जसे येतील तसतसा परमचैतनत्याचा अविष्कार जास्त प्रगट होईल, कारण मग ते अनेक वाहिनींमधुन वाहत राहील आणि कार्य होत राहील.

आता तुम्हाला ईश्वरी शक्तीची जाणीव झाली आहे, आत्मसाक्षात्कार मिळाला आहे आणि तुम्ही सर्वजण संतपुरुष झाला आहात तर अशा स्थितींमध्ये असेच जे अनेक लोक होऊन गेले त्यांचे जीवन आपण पाहिले पाहिजे. सुफी, नाथपंथी, Gnostics असे अनेक संत प्रत्येक धर्मामधे झाले. त्यांनी काय केले? त्यांनी सर्व प्रयत्न करुन लोकांना परमात्म्याच्या शक्तीबद्दल जागृत केले. त्यांना साक्षात्कार देणे शक्य नव्हते, त्यांनी त्याची सत्यता पटवून देता आली नाही पण ते त्याच्याबद्दल बोलले, त्याची गाणी-भजने रचली. आपल्याही हेच समजून घ्यायचे आहे की आपल्याला करुणा व्यक्त करण्यापासून कोणी रोखू शकत नाही. लोक बुडायला लागले आहेत, रसातळाला चालले आहेत, मानवांवर हीन प्रवृत्तींचा हल्ला होत आहे हे पाहिल्यावर तुमच्यामधे करुणा असेल तर तुम्ही वाट्टेल ते करुन त्यांना वाचवायचा प्रयत्न कराल. हेच चिद्‌विलासाचे कार्य आहे. तुमच्या चित्त-शक्तीचा हाच आनंद आहे. तुम्ही जितके जास्त लोक या परमेश्वरी शक्तीच्या संपर्कात आणाल तितका तुमच्या चित्ताला आनंद होईल. परमेश्वराशिवाय लोकांना तारणारा दुसरा कोणी नाही हे प्रत्येकाला मान्य असते. प्रत्येकजण तेच म्हणतो, पण परमेश्वर कसा आहे आणि त्याला कसे ओळखायचे हे कुणाला माहीत नव्हते. आतां तुम्हा सगळ्यांना ते कळले आहे. कुण्डलिनी जागृत करण्याची क्षमता तुमच्याजवळ आहे. तुम्हाला चक्रे व त्यांची पक्कड याबद्दल माहिती आहे, व्हायब्रेशन्सवरून कुठल्याही गोष्टीची सत्यता पडताळून पाहू शकतां जितकी जास्त ही शक्ती तुम्ही वापराल तितके चांगले. जिथे तुम्ही अजून गेला नाहीत अशा ठिकाणी आता जा. आफ्रिकेमधील फार थोडे लोक आपल्यामध्ये आहेत, म्हणून मी पुढच्या वर्षी त्या कामासाठी आफ्रिकेला जायचा विचार करत आहे. अशाच तऱ्हेची नवीन ठिकाणे जिथे हे कार्य अजून व्हायचे आहे, आपण शोधली पाहिजेत. अशाच गोष्टी पाहिजेत, तुमच्यामधील करुणाच तुम्हाला हे कार्य करायला प्रवृत्त करेल आणि त्यामुळे अजून जे साधक नाहीत त्यांनाही आसरा मिळेल. ज्या लोकांजवळ काहीच नाही त्यांच्यासाठी काही चांगल्या संस्था निर्माण करण्याच्या कामात मी गर्क आहे, ते भुकेले उपाशी आहेत, खूप असहाय्य आहेत आणि फार कष्टमय जीवन जगत आहेत. सहजयोगात आल्यावर तुमची हाव व अभिलाषा संपली आहे म्हणून तुम्हीच हे करू शकाल. ते सर्व संपल्यामुळे तुम्ही मुक्त व स्वतंत्र झाला आहत. एरवी पुष्कळ लोक जे असले कार्य करतात ते कालान्तराने नेते बनतात किंवा उधळपट्टी करून पैसे कमावतात हे मी पाहिले आहे. पण तुम्ही तसे नाही. ख्रिस्तांनी म्हटल्याप्रमाणे तुम्ही "मीठ" बनला आहात जे परमात्म्याच्या सत्तेमधे पूर्ण विरघळून गेले आहे आणि आणखी लोकांना तसेच विरघळून टाकणार आहे.

मिशनरी लोकांसारखे आपल्याला लोकांना जबरदस्तीने सहजयोग द्यायचा नाही; उलट प्रथम लोकांकडे काय कमतरता आहे हे आपण प्रथम समजून घ्याचे आहे. जगात आजकाल प्रामाणिक लोक फार थोडे आहेत. कसलीही हाव नसलेले लोक मला माहीत होते पण जरा कुठे सत्ता हातात आली की इतके हावरट झाले, आणि तुम्ही कधी असे न करणारा म्हणून ओळखणारा माणूस एकदम इतका हावरट झाल्याचे कळल्यावर तुमचा विश्वास बसणार नाही. पण सहजयोगी तसे नाहीत, ते तसलं काही करणार नाही. ते फक्त त्याच्या करुणेचा आनंद घेतील, दुसरे काही नाही. त्यांच्यासारखा मोह नाही, त्यांच्यासारखी हाव नाही किंवा त्यांच्यासारखे मादक सेवन, दारू इ. बेकार गोष्टी पण घेणार नाही. कारण त्यांना आनंद कुठे असतो ते माहीत असते. एकदा तुम्हाला हा आनंदाचा झरा सापडला की तुम्ही त्या आनंदाच्याच मागे लागाल, तुम्हाला ते सहजच जमेल.

पुरुष जसे आता हे कार्य करत आहेत तसेच महिलांनी पण या कार्याला लागावे कारण करुणा, क्षमा हे गुण स्त्रियांजवळ जास्त असतात. कारण त्या माता असतात, त्यांना मुले असतात आणि मुलावरचे प्रेम त्यांना जात्याच असते. आई कधीच कसली अपेक्षा करत नाही, तिला फक्त आपले मूल निरोगी व

सुखी असावेसे वाटते. तिला मुलापासूनचा फक्त आनंद हवा असतो. तुम्ही महिला असलात म्हणजे करुणा मुळांतच तुमच्यामधे असते. लहान मुलीसुध्दा एकादे बालक दिसले तर त्याच्याकडे धावत जातील, त्याला उचलून कडेवर घ्यायला त्यांना आवडते, त्यांच्याजवळ बाहुल्या असतात आणि त्यांची ते मुलासारखी देखभाल करतात. जात्याच करुणामय प्रकृती असल्यामुळे स्त्रियांना करुणा व्यक्त करणे आणि तिचा अविष्कार करणे जास्त जमण्यासारखे आहे, तुम्ही विवाहीत असल्यामुळे तुमच्या नवऱ्यांना तुमच्यातील दैवी शक्तीमुळे आधार मिळतो. कुणी म्हणतात मी देवासाठी हे सोडून दिले, त्याचा त्याग केला. पण देवासाठी कशाला त्याग करायला हवा ? देवाला कशाची तरी जरुर असते का ? त्याला काहीही कमी नाही. तुम्ही तुमची बुध्दी मात्र टाकून दिली आहे म्हणून सूज्ञता उरलेली नाही.

तोच फक्त सर्व काही बदलून टाकतो आणि तेही अशा तऱ्हेने घडून आणवतो की तुम्हाला काय होते आणि कसं होते हे कळतसुध्दा नाही. तुम्हाला एवढंच करायचे असते ते म्हणजे हे नाट्य पहात रहायचे. सहजयोग्यांनीही त्याच प्रकारे एकमेकांबरोबर समजूतीने, सलोख्याने व आनंदात रहायला हवे. सहजयोगी जर जीवनात आनंद मिळवू शकला नाही, कुंडलिनीच्या जागरणातून परमात्म्याच्या शक्तीच्या अनुभवानंतरही आनंद मिळवू शकला नाही तर दुसऱ्या कुणाला तो मिळवता येईल मला समजत नाही. परमात्म्याशी जो पूर्णपणे एकरूप झाला आहे अशा माणसाला अडचण म्हणून कधी येणंच शक्य नाही. तुम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात आला आहात हे लक्षात घ्या, तुम्ही या साम्राज्यात आला अहात आणि आदिशक्तीची करुणा तुमच्यावर सतत लक्ष ठेऊन आहे. पण हे असं होते की आयुष्यभर भीक मागत राहिलेल्या भिकाऱ्याला एकदम सिंहासनावर बसवले तर तिथे बसूनही तो हात पुढे करत भिक्षाच मागत बसतो. सहजयोग्यांचेही कधी कधी असेच होते. कमीत कमी असं न करण्याचा प्रयत्न तुम्ही केला पाहिजे कारण त्याचा इतर लोकांवर उलटा परिणाम होतो.तुमच्या स्वतःच्या जीवनांतही याला फार महत्व आहे, म्हणून तुम्हाला मिळालेल्या शक्तीचा अर्थ नीट समजून घेऊन तुम्ही वरच्या स्थितीला आले पाहिजे. माताजींना तुम्ही समर्पित व्हायला हवे या म्हणण्याचा अर्थ काय ? आपल्याला काय समर्पित करायला हवे ? तर तुमच्या ज्या चुकीच्या कल्पना आहेत, जे तुमच्यासाठी विनाशकारी आहे, जे तुम्हाला चुकीच्या मार्गाकडे नेते ते ते सर्व आणि तुमचा अहंकार व प्रति- अहंकार इ. सर्व तुम्हाला समर्पित करायला हवे आणि तेही तुमच्याच शुध्दीसाठी , आनंद मिळवण्यासाठी आणि परमात्मा समजून घेण्यासाठी. तुम्ही स्वतःलाच जर नीट ओळखले नाही तर परमेश्वराला कसं ओळखणार ? ते एरवी शक्यच नाही, म्हणून स्वतःला जाणण्यासाठी तुम्ही उन्नत व्हायला हवे. तुमच्यामधे काही फार उत्कृष्ठ सहजयोगी आहेत हे मला माहीत आहे पण तरीही मी म्हणेन की अशा चांगल्या सहजयोग्यांनी आता आणखी बऱ्याच क्षेत्रांमधे शिरकाव करून हे कार्य करायला हवे, त्यांना ते नक्की जमेल.

मी प्रथम रोममधे आले तेव्हां हॉलमधे एकही माणूस नव्हता. मग मला वाटले या देशाचे पुढे काय होणार आहे ? आता इथे खूप सहजयोगी झाले. पण या समान पातळीवर पसरणाऱ्या प्रगतीबरोबर तुम्हाला उत्तरोत्तर उर्ध्वमुख होणारी प्रगती करायची आहे. संख्येच्या वाढीबरोबर परिपक्वता वाढायला हवी. ती वाढ जशी होत राहील तसतसे आणखी लोक येत राहतील, कारण तुमची सामुहिकता इतकी चांगली असल्याचे मला दिसते की तुम्ही नेहमीच सांगता की माताजी मी अजून चांगला सहजयोगी झालो नाही. माझा भाऊ अजून सहजयोगात आला नाही. तुमची ही भावना मी जाणते. पण त्यांचं सोडून द्या आणि जे खरोखर साधक आहेत त्यांच्याकडे बघा. तेच तुमचे खरे नाते-संबंध आहेत. मग कालान्तराने ते सर्व तुमचे आई-वडील, बहीण-भाऊ, मुले-जण येणारच आहेत. मग इतरही आणखी येतील, सध्या ते साधक बनलेले नाहीत. जे साधक आहेत त्यांना शोधून काढा. माझं तुमच्यावर पूर्ण लक्ष आहे आणि जेव्हां जेव्हां तुम्ही माझे स्मरण कराल तेव्हां मी तुम्हाला पूर्ण मदत करणार आहे तुम्हाला ज्या कशाची जरुर वाटेल त्या त्या वेळी मी तुमच्या मदतीला येणार आहे. आणि जसं होईल तशी मदत करणार आहे. तुम्हाला जे अवघड वाटते ते तुम्ही त्याची जबाबदारी आपल्यावरच मानता म्हणून, ते जर तुम्ही या सर्वव्यापी शक्तीवर, परमेश्वराच्या प्रेमशक्तीवर, आदिशक्तीवर वा परमचैतन्यावर सोपवले तर काहीही अशक्य नाही. तुम्हाला जमणार नाही इतकं अवघड काहीही नाही.

आजची ही पूजा करणे फार महत्वाचे आहे. कारण त्यातूनच तुमची वाढ होणार आहे हे प्रतिबिंब जास्त स्पष्ट होत जाते, तुमच्या आंत-आत मधे खोलवर आदिशक्तीच्या शक्तीमधूनच जास्त परिवर्तन होत राहते. आदिशक्तीची स्वतःची कुण्डलिनी आहे. ती आदिकुण्डलिनी आणि तिथेच प्रतिबिंब म्हणजे तुमच्यामधील कुण्डलिनी. म्हणून तुम्ही हृदयापासनू पुजा करा आणि अशी करा की तुमची कुण्डलिनी आणि माताजी ज्यांनी तुम्हाला जन्म दिला प्रसन्न होतील.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

# श्री कलकी व श्री कुंडलिनी शक्ती

( २६ सप्टेंबर १९७२ रोजी हिंदुजा ऑडिटोरियम मुंबई येथे झालेल्या श्री माताजींच्या भाषणाच्या आधारे)

श्री कुंडलिनी शक्ति आणि श्री येशुख्रिस्त हा विषय फारच मनोरंजक व आकर्षक असून सामान्य लोकांच्यासाठी एक अभिनव विषय आहे, कारण की आजपर्यंत कधीही कोणीही श्री.येशुख्रिस्ताचा संबंध कुंडलिनी शक्तिशी लावलेला नाही. धर्मांच्या विराट वृक्षावर अनेक देशांमध्ये अनेक प्रकारच्या भाषांमध्ये अनेक प्रकारचे पुष्परुपी साधुसंत होऊन गेले. ह्या विभूतींचा आपापसात काय संबध होता ते फक्त त्या विराट वृक्षालाच माहित आहे. जेथे जेथे पुष्परुपी साधुसंत झाले, तिथे तिथे त्यांनी धर्माचा सुगंध पसरविला. परंतु आसमंतातील लोकांना या सुगंधाचे किंवा साधुसंताचे महत्व समजले नाही. तेव्हा एखादया संताचा संबंध आदिशक्तिशी असु शकतो किंवा नाही ह्याची जाणीव इतरजनांना असणे दुरच.

मी ज्या स्थितीवरुन आपणास हे सांगत आहे त्या स्थितीत आपण प्राप्त झाल्यास वरील गोष्टीची अनुभूती आपणास येईल. कारण मी जे आपणास सांगत आहे हे सत्य आहे किंवा नाही हे जाणण्याचे तंत्र सध्या आपणाकडे नाही. किंवा सत्य काय आहे ह्याची सिध्दता आपणाकडे सध्या नाही तोपर्यंत आपले शारिरीक यंत्र वरील गोष्ट पडताळून पहाण्यास परिपूर्ण नसते. परंतु ज्यावेळी आपले शारिरीक यंत्र सत्याशी जोडले जाते, त्यावेळी आपण वरील गोष्टीचा पडताळा घेऊ शकतो. याचाच अर्थ प्रथम आपण सहजयोगात येऊन 'पार' होणे आवश्यक आहे. 'पार' झाल्यानंतर आपल्या हातातुन चैतन्य लहरी वाहू लागतात. एखादी गोष्ट सत्य असल्यास आपल्या हातात थंडथंड चैतन्य लहरींचे तरंग येऊ लागतात व असत्य असेल तर गरम लहरी येतात. अशा तऱ्हेने प्रयोग करुन आपण एखादी गोष्ट सत्य आहे किंवा नाही हे जाणू शकतो.

ख्रिश्चन मंडळी श्री येशु ख्रिस्ताबद्दल जे जाणतात ते बायबल ह्या ग्रंथामुळे बायबल हा ग्रंथ अतिशय गुढ आहे. हा इतका गहन आहे की कित्येक मंडळी त्यातील गहन अर्थ किंवा गुढार्थ असमजु शकले नाहीत. बायबलामध्ये असे लिहीले आहे की, 'मी' बाळाच्या जीभा धारण करुन तुमच्या समोर येईन'. इतर लोकांनी ह्याचा अर्थ असा मानिला की, ज्यावेळी परमेश्वराचे अवतरण होईल त्यावेळी त्याच्यामधून ज्वाला निघत असतील किंवा त्याव्दारे आपण त्याला पाहू शकणार नाही. वस्तुतः जर खरा अर्थ पाहिला तर तो असा आहे की माझे दर्शन आपणास सहस्त्रारात होईल. बायबल ह्या ग्रंथात अनेक ठिकाणी अशा प्रकारे श्री कुंडलिनी शक्ती व सहस्त्रार ह्याचे वर्णन आढळेल अशा गोष्टींचे फक्त संक्षिप्त वर्णन आता इथे येणे शक्य आहे.

श्री येशु ख्रिस्तांनी सांगितले आहे की, 'जे माझ्या विरोधात नाहीत ते म्लेच्छ आहेत' ह्याचा अर्थ जी मंडळी माझ्या विरोधात नाहीत ती माझ्या बरोबर आहे. आपण ख्रिश्चनमंडळींना जर विचारले की ही मंडळी कोण होती तर त्यांना ह्याचा पत्ता नाही.

श्री येशुख्रिस्तांमध्ये दोन महान शक्तिचा संयोग आढळतो. एक श्री गणेशांची शक्ति, जी श्रीयेशुख्रिस्तांची मूळ शक्ति मानली गेली आहे व दुसरी शक्ति श्री कार्तिकियांची त्यामुळे श्री येशुख्रिस्तांचे स्वरुप हे संपूर्ण ब्रह्मतत्व ॐकार रुपी आहे. श्रीयेशुख्रिस्ताचे पिताजी साक्षात् श्रीकृष्ण असल्यामुळे, श्रीकृष्णांनी त्यांना जन्मापूर्वीच अनेक वर दिले होते. त्यापैकी एक वरदान हे कि तुम्ही नेहमी माझ्यापासून वरच्या स्थानावर स्थित असाल. ह्याचे स्पष्टीकरण असे देता येईल कि श्रीकृष्णांचे स्थान आपल्या मानेच्या ठिकाणी असलेल्या विशुध्दी चक्रावर आहे, तर श्री ख्रिस्तांचे स्थान आपल्या डोक्यात मागील बाजूस दोन डोळ्यांच्या दृष्टीवाहून नेणाऱ्या नसा छेदतात तेथे स्थित असलेल्या आज्ञा चक्रावर आहे. तसेच दुसरा वर श्रीकृष्णानी असा दिला होता कि, 'तुम्ही' साऱ्या विश्वाचे आधार व्हाल. तिसरा वर असा कि मला पुजेमध्ये जे प्राप्त होते, त्याच्या सोळावा हिस्सा सर्वप्रथम तुम्हाला मिळेल. या प्रकारे अनेक वरदान दिल्यानंतर श्रीकृष्णांनी त्यांना अवतार घेण्याची आज्ञा दिली.

आपण श्री मार्कंडेय पुराण वाचल्यास वरील गोष्टी आपणास समजतील, कारण की, श्री मार्कण्डेय यांनी अशा अनेक सुक्ष्म गोष्टी उघड करुन सांगितल्या आहेत.

हयाच पुराणांत श्रीमहाविष्णुंचे वर्णन सुध्दा केले आहे. आपण ध्यांनात जाऊन हे वर्णन ऐकले तर लक्षात येईल की हे वर्णन श्री. येशुख्रिस्तांचेच आहे.

आता आपण श्री ख्रिस्त हा शब्द आभ्यासिला तर असे लक्षात येईल कि, हा शब्द ' कृष्ण ' या शब्दाच्या अपभ्रंशापासुन निर्मित झाला आहे. वास्तविक श्रीयेशुख्रिस्ताचे पिताजी श्री श्रीकृष्णच आहेत आणि हयामुळेच त्यांना ख्रिस्त म्हणतात. त्यांचे नांवा सुध्दा ' जिझस ' ज्या प्रकारे बनविले गेले आहे ते मनोरंजक आहे. श्री यशोदा मातेस ' येंसु ' या नावांनी संबोधिले जात असें, तर उत्तर प्रदेशांत अजूनही कोणाचे नाव ' येशु ' असल्यास तसे न म्हणता ' जेंसु ' म्हणतांना आपणास आढळेल. यावरुन असे स्पष्ट होते की, यशोदा पासून येंशु व त्यापासुन जसु व त्यापासून श्री. जिझस ख्राईस्ट हे नाव तयार झाले आहे.

ज्या ज्या वेळेस श्री ख्रिस्त आपल्या वडिलांच्या गोष्टी सांगत् असत त्या त्या वेळी ते श्रीकृष्णांबद्‌दल सांगत होते. ते ' विराटच्या ' गोष्टी करत होते. कारण की त्यांच्या अवतरणाच्या काळात जरी श्रीकृष्णांनी त्यांच्याबरोबर अवतार घेतला नव्हता तरी त्याचे सर्व कार्य विराट पुरुषाला म्हणजेच 'परमेश्वराला' साधकांना कसे जाणावे याकरताच होते. श्री ख्रिस्तांची आई साक्षात श्री महालक्ष्मी होती. श्री मेरीमाता त्याच श्री महालक्ष्मी व आदिशक्ती होत. आणि आपल्या मातेस त्यांनी होली घोस्ट म्हणून म्हटलेले आहे.

श्री ख्रिस्ताच्याकडे एकादश रुद्राच्या शक्त्या आहेत, म्हणजेच अकरा संहार शक्त्या होत. हया शक्त्याची स्याने आपल्या माथ्याच्या सभोवार आहेत. ज्यावेळेंस श्री कलकी, शक्तीचे अवतरण होते, त्यावेळेंस हया सर्व अकरा शक्त्या संहारांचे कार्य करतात. या अकरा शक्त्यापैकी एक शक्ती श्री हनुमानांची आहे तर दुसरी श्री भैरवनाथांची आहे. या दोन शक्तींना बायबलमध्ये अनुक्रमे सेन्ट मायकेल व सेंटग्रॅब्रियल अशी नावे दिलेली आहेत. आपण हया शक्तींना सहज योगात येऊन पार झाल्यावर इंग्रजीत संबोधित करुनही त्यांना जागृत करु शकतो अथवा मराठीत (म्हणून) किंवा ' संस्कृतमध्ये पण संबोधीत करुन जागृत करु शकतो. आपल्या उजवीकडील नाडी; पिंगला नाडी ही श्री हनुमानजींच्या शक्तीने कार्यान्वित होत असते, की ज्यावेळेस आपल्या पिंगला नाडीवर दाब येतो किंवा त्यात अवरोध निर्माण होतो, त्यावेळस श्री हनुमानजींच्या मंत्राने लगेच फरक जाणवतो. तसेच जर श्री सेन्ट मायकेल यांचे नाव घेतले, तरी पिंगला नाडीत फरक जाणवेल. आपल्या डावीकडील नाडी इडा नाडी सेन्ट गॉब्रियल किंवा श्री भैरवनाथांच्या शक्तीने कार्यान्वित होत असते व त्यांच्या मंत्रामळे ईडानाडी वरील त्रास किंवा आवरोध कमी होतो.

वरील गोष्टीचा पडताळा सहजयोगात येऊन पारझाल्यावर कोणासही येऊ शकतो हे सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, आपण स्वःला हिंदु किंवा मुसलमान किंवा ख्रिश्चन असे वेगळे करुन आपापसात भांडण करणें म्हणजे मुर्खपणा आहे. आपण यातील तत्वाची गोष्ट पकडली तर लक्षात येईल की एकाच धर्माच्या वृक्षावरील ही अनेक फुले आहेत व आपापसात एकाच शक्तीमुळे संबंधित आहेंत.

आपणास कदाचित जाणून आश्चर्य वाटेल की, सहजयोगात कुंडलिनी जागृति होणे हे साधकाच्या आज्ञाचक्रावर फार अवलंबून असते. सध्याच्या युगात ब-याचशा मंडळींवर अहंकाराची छाप जास्त आहे. कारण की, अनेक मंडळी अहंकराच्या प्रवृत्तीत गुंतलेली आहेत. अहंकारी वृत्तीमुळे मनुष्य आपल्या ख-या धर्मापासुन विचलीत होतो व त्याची दिशाभूल झाल्यामुळे तो अहंकाराला पुष्टी देणारी जी कार्ये आहेत, अशा कार्यात सतत मग्न असतो. या अहंकारापासुन मुक्तता मिळवण्यासाठी श्री येशु ख्रिस्ताची फार मदत होते.

ज्याप्रमाणे श्री महंमद पैगंबरांनी कुंडलिनी जागृती व दुष्ट शक्तीपासुन कसे निवारण करायचे याबद्‌दल लिहिले आहे, त्याचप्रमाणे श्री ख्रिस्तांनी फारच सोप्या प्रकारे आपणात कोणत्या शक्ती आहेत व कोणती आयुधे आहेत त्याबद्‌दल सांगितले आहे.

त्यापैकी प्रथम म्हणजे 'क्षमा' करणे हे होय. जे श्रीगणेशतत्वामधे परोक्ष रुपाने जे कार्य करते, ते मनुष्यतत्वांत क्षमेच्या रुपाने कार्यान्वीत होते. वास्तविक क्षमा फार मोठे आयुध आहे. कारण त्यामुळे मनुष्य अहंकारापासुन बचावला जातो. जर आपणास कोणी दुःख दिले, त्रास दिला किंवा कोणी आपला अपमान केला, तर आपले मन सारखे त्याबद्‌दल विचार करीत राहील व उद्‌विग्न होईल. आपण रात्रदिन अशा माणसाबद्‌दल विचार कराल व झालेल्या घटना परत परत आठवून स्वतःला त्रास करुन घ्याल. परंतु यांतुन मुक्त होण्यास सहजयोगात आम्ही अशा माणसांस सर्वांना क्षमा करण्यास सांगातो. दुस-यांना क्षमा करणे हे एक मोठे आयुध श्री ख्रिस्तांमुळे आम्हास प्राप्त झाले आहे. ज्यामुळे आपण स्वःला इतरांपासुन होणा-या त्रासांतुन मुक्त करु शकतो.

श्री ख्रिस्तांकडे अनेक शक्त्या होत्या व त्यामधे एकादश रुद्र स्थित आहेत हे वर सांगितलेले आहे. इतक्या सर्व शक्त्या त्यांच्यामधे असूनसुध्दा त्यांनी स्वतःला क्रुसावर का टांगून घेतले किंवा यामधून ते स्वतःस का वाचवू शकले नाहीत? श्री ख्रिस्ताकडे इतक्या शक्त्या होत्या कि ते त्यांना त्रास देणा-याचे क्षणात हनन करु शकले असते. त्याची आई श्री मेरीमाता साक्षात् श्री आदिशक्ती होती व त्या मातेस सुध्दा तिच्या मुलावरील होणारे अत्याचार पाहवले गेले नाहीत. परंतु परमेश्वराला नाटक करावयाचे होते. खरी गोष्ट तर ही आहे की, श्री ख्रिस्त सुख किंवा दुःख यात गुरफटले नव्हते व त्यांना हे नाटक पूर्णपणे वठवायचे होते त्यांच्यासाठी सर्व खेळ होता. पण लोकांनी त्यांना सुळावर चढविले ती मंडळी किती मूर्ख होती? त्या काळच्या लोकांमधिल मूर्खपणा निघून जावा म्हणून श्री ख्रिस्त स्वतः गाढवावर स्वार होत होते. आपणास कधी डोक दुखीचा त्रास होत असल्यास आपण कुठेही

औषध न घेता, श्री ख्रिस्तांची अशी प्रार्थना करा की, या जगांत ज्यांनी कोणी आम्हाला त्रास दिला आहे, अशा सर्वांना क्षमा करा. तर आपली डोकदुखी लगेच थांबेल. मात्र यासाठी आपण सहजयोगांत येऊन कुंडलिनी जागृती घेऊन त्यांनतर पार होणं आवश्यक आहे. कारण सहजयोगांत कुंडलिनी शक्तीच्या जागृती नंतर साधकामधील श्री ख्रिस्ततत्व जागृत होते, नाहीतर नाही.

हे चक्र इतके सूक्ष्म आहे की, डॉक्टर्ससुध्दा हे पाहू शकत नाहीत. या चक्रावर एक अतीसूक्ष्म व्दार आहे. ह्यामुळेच श्री ख्रिस्तांनी म्हटले होतं की, 'मी दरवाजा आहे' हे अतिसूक्ष्म व्दार उघडण्यास सोपे व्हावे, या करिताच श्री ख्रिस्तांनी या भूतलावर अवतार घेतला व स्वतः हे व्दार प्रथम उघडले. आपल्या अहंभावामुळे आपण श्री ख्रिस्तांना सुळावर चढविले कारण की, एखादा मनुष्य परमेश्वर म्हणून कसा येऊ शकतो, हे आम्हाला आमच्या बुध्दिला पटले नाही व आपण आपल्या अहंकारामुळे सत्याचा धिक्कार केला. श्री ख्रिस्तांनी असे कोणते वाईट कृत्य केले होते कि ज्यामुळे त्यांना सुळावर चढविले गेले! उलट जगांतील अनेक रोगी लोकांना त्यांनी त्यांच्या शक्तीने बरे केल. जगात सत्याचा प्रचार केला. लोकांना कित्येक चांगल्या गोष्टी शिकवल्या, लोकांना सुव्यवस्थित, सुसंस्कृत जीवन जगायला शिकविले, ते नेहमी प्रेमाच्या गोष्टी करत. लोकांसाठी अनेक चांगल्या गोष्टी करुन सुध्दा अखेरीस आपण त्यांना दुःख दिले, त्रास दिले. जी माणसं तुम्हाला घाणेरडे शिकवतात किंवा तुम्हाला मूर्ख बनवितात, त्यांच्या मात्र तुम्ही पाया पडाल. मूर्खपणाची किती कमाल आहे बघा? हल्ली कोणीही सोप्या गोष्याने गुरु व्हावं, लोकांना लुबाडाव, लोकांकडून पैसे उकळावेत असे चालले आहे. अशांची लोक वाहवाह करतात कोणी सत्यावर उभे राहून लोकांना खरा मार्ग दाखवायचा म्हटल, तर त्याचे कोणी ऐकत तर नाहीतच, परंतु उलट त्यांच्यावर हल्ले चढवतात. अशा महामुर्ख लोकांना धडे शिकवण्यासाठी परमेश्वराने त्याच्या सुपुत्राला, श्री ख्रिस्तांना या जगांत पाठविले, पण त्यांना लोकांनी सुळी दिले आणि असेच प्रकार अनेक वेळा लोक करत आहेत.

आपण इतिहास वाचाल तर हे आपल्या लक्षात येईल. ज्या ज्या वेळेस परमेश्वराने अवतार घेतला आहे किंवा संतमहात्म्यांनी अवतार घेतला आहे त्या त्या वेळेस लोकांनी त्यांना दुःख कष्ट व त्रास दिलेले आहेत त्यांच्याकडून शिकण्याऐवजी स्वःत मूर्खांसारखे वागले. महाराष्ट्रातीलच संत श्रेष्ठ श्री तुकाराममहाराज किंवा श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्याबाबतीत हेच दिसून येईल. तसेच श्री गुरु नानक, श्री महंमद साहेब ह्यांचे बाबतीत पण तसाच प्रकार झाल्याचे दिसेल.

मनुष्य नेहमी सत्यापासून पळत असतो व असत्य गोष्टींना चिकटून रहातो.

जेव्हा कोणी साधुसंताचे किंवा परमेश्वराचे अवतरण होते, त्यावेळी जर असा प्रश्न विचारला की ही व्यक्ति अवतारी संत अथवा पवित्र आहे का? तर सहजयोगात लोकांना असा प्रश्न विचारताक्षणीच लगेच थंड लहरी हातांत येऊन अशा प्रश्नाचे होकारार्थी उत्तर मिळेल. गत गोष्टींमुळे मनुष्याचा अहंकार वाढतो. उदा. मी अमक्याचा शिष्य आहे इत्यादी.

परंतु जे समोर प्रत्यक्ष प्रमाण असते त्याचे माणसाला भान नसते. त्यात मनुष्य स्वतःचा स्वार्थ गमावतो. आता पहा स्वार्थ म्हणजे 'स्व' चा अर्थ आपण समजणे आवश्यक आहे. आज गंगा समजा एका ठिकाणाहून वहात आहे. पण आपण दुसरीकडे जाऊन बसलात व म्हणू लागलात की गंगा या ठिकाणाहून वहात आहे व आम्ही गंगानदीवर बसलो आहेत. हे जसे हास्यास्पद होईल, तद्वतच ही गोष्ट होय. आपणासमोर आज जे साक्षात किंवा प्रमाण आहे. त्याचाच स्विकार करा. श्री ख्रिस्तांच्यावेळी देखील अशीच परिस्थिती होती. त्यावेळी श्री ख्रिस्तांनी कुंडलिनी जागृतीचे अनेक प्रयत्न केले परंतु महामुश्कीलीने २१ जणांना त्यांनी पार केले. सहजयोगात मात्र हजारो जण पार झाले आहेत. श्री ख्रिस्त त्यावेळी अनेकांना पार करु शकले असते पण त्यांच्या शिष्यांनी असा विचार केला, की श्री ख्रिस्त फक्त रोग्यांना बरे करतात व त्या व्यतिरिक्त कांही असेल असे त्यांना वाटले नाही. त्यामुळे त्यांचे सर्व शिष्य सर्व प्रकारच्या रोग्याना त्यांच्याकडे घेऊन येत असत. श्री ख्रिस्तांनी अनेक वेळा पाण्यावर चालून दाखविले होते, कारण की ते स्वतः प्रणव होते ॐकाररुपी होते. इतके असून सुध्दा त्यावेळच्या लोकांच्या हे लक्षात आले नाही की, श्री ख्रिस्त परमेश्वराचे सुपुत्र होते. महामुश्कीलीने त्याकाळी श्री ख्रिस्तांनी काही कोळयांना एकत्र केले (कारण की इतर कोणी मंडळी त्यांच्याबरोबर यायला तयारच नव्हतो) व फार मुश्कीलीने त्या कोळयांना त्यांनी पार केले. पार केल्यावर ही कोळी मंडळी श्री ख्रिस्तांकडे कुणा ना कुणा रोग्याला बरे करण्यासाठी घेऊन येत. 'आमच्या येथे सहजयोगांत सुध्दा बरीच मंडळी पार व रोगमुक्त झाली आहेत' अनेक मनुष्याने समजले पाहिजे की, अहंकार फार सूक्ष्म आहे.

आता दुसरा प्रकार आढळतो तो म्हणजे आपल्या अहंकाराशी लढायचे. ते पण ठीक नाही. अहंकाराशी टक्कर देऊन तो नाहीसा होत नाही. तो आपल्यात शोषित झाला पाहिजे ज्यावेळेस आपे चित्त कुंडलिनीवर विराजमान होते व अशावेळी कुंडलिनी आपल्या ब्रह्मरंध्रास छेदते व विराटांत सामील होते, त्यावेळी अहंकार शोषित होतो. खरा अहंकार म्हणजे विराट अहंकार म्हणजेच त्या विराटशक्तीचा अहंकार. किंबहुना विराटच अहंकार आहे. आपल्या मधील अहंकार सुटत नाही. काय करता आपण? अहंकराति सः अहंकारः आपण स्वतःला विचारुन पहा की आपण काय करतो? एखाद्या मृत वस्तुचा आकार बदलण्या व्यतिरिक्त आपण करु शकतो का? एखाद्या फुलापासून आपण फळ बनवू शकतो का? हे नाक, हे तोंड, हे सुंदर मनुष्य शरीर आपणास प्राप्त झाले, हे कसे झाले? आपण अमीबापासून मानव स्थितीला कसे प्राप्त

झाले हे कसे झाले? परमेश्वराची असीम कृपा होय की, ज्यामुळे आपणास अतिसुंदर असा मानव देह प्राप्त झाला. काय मानव याची परतफेड करु शकतो का? आपण असे कोणतेही जिवंत कार्य करु शकतो? एका टेस्ट टयुब बेबीच्या निर्माणानंतर मनुष्यांत इतका मोठा अहंकार निर्माण झाला त्यातही पाहिले तर मूलत: हे कार्य जीवंत नाही. कारण की, ज्या प्रकारे आपण एखाद्या झाडाचे (Cross Breedind) करतो तद्वतच एक ठिकाणाहून जिवंत जीव घेऊन ही क्रिया केली आहे. पण ह्या गोष्टीला सुध्दा मानवाला केवढा अहंकार ? चंद्रावर जाऊन पोहोचले तर किती अहंकार. ज्याने चंद्रसुर्यासारखे अनेक ग्रह तारे व ही सृष्टी बनविली त्याच्यापुढे आपला अहंकार दांभिक आहे खोटा आहे. व त्या विराट पुरुषाचा अहंकारच सत्य आहे, कारण की, तो सर्व करीत आहे.

विराट पुरुष सर्व करीत आहे हे समजले पाहिजे. तेव्हा श्री विराट पुरुषालाच सर्व काही करु द्या. आपण एक यंत्राप्रमाणे आहेत. समजा मी एखाद्या माईक वरुन बोलत आहे व माईक मधून माझे बोललेले आपणापर्यंत वहात आहे. माईक फक्त साक्षी आहे, पण बोलण्याचे कार्य मी करत आहे व ती शक्ती माईक मधून वहात आहे. तद्वत आपण परमेश्वराचे एक यंत्र आहात. त्या विराटाने आपणास घडवले आहे. तेव्हा त्या विराटाची शक्ती आपणामधून वाहू द्या व स्वत:चा अर्थ लावून घ्या. हाच अर्थ उलगडून सांगण्यासाठी आज्ञाचक्र की, जे अतीशय कठीण चक्र आहे व ज्यावर स्थित अतिशय सुक्ष्म तत्व ॐकार, प्रणव स्थित आहे, तेच म्हणजे श्री ख्रिस्त हे या जगात अवतरीत झाले. आता कुंडलिनीचा व श्री ख्रिस्तांच संबंध म्हणजे सुर्याचा सुर्यकिरणाशी जो संबंध त्याप्रमाणे किंवा चंद्राचा चंद्रीकेशी जो संबंध, त्याप्रमाणे आहे.

श्री कुंडलिनीने, म्हणजेच श्री गौरीमातेने आपल्या शक्तीने तपस्याने मनोबळाने व पुण्याइने श्री गणेशांना निर्माण केले. ज्यावेळेस श्री गणेश स्वत: अवताञ घेण्यास सिध्द झाले त्या वेळस श्री ख्रिस्ताचा जन्म झाला. अवतार

या संसारात अनेक गोष्टी आहेत ज्यांचा उलगडा अजूनही मानवास झालेला नाही. का आपण असा विचार करता की एखाद्या बीजामधे अंकुर कसा निर्माण होतो? आपण श्वास कसे घेतो? आपलं चलन वलन कसं होतं? आपल्या मेंदूमधे शक्ती कोठून येते? आपण या संसारात कसे आलो? अशा कित्येक गोष्टी आहेत. काय मनुष्य या सर्वाचे निदान लावु शकतो का? आपण म्हणतो कि पृथ्वीत गुरुत्वाकर्षणाची शक्ती आहे. परंतु आपण असा विचार करा की ही शक्ती कोठून आली? आपणाला अनेक गोष्टींचा उलगडा अजून झालेला नाही कारण की आपण भ्रमांत आहात वया भ्रमाचा बीमोड करावयास हवा. जोपर्यंत आपणामधील भ्रमाचा भोपळा फुटणार नाही, तोपर्यंत आपणामधे भ्रामकता जास्त प्रमाणात बळावेल. या संसारात मानवाच्या उत्क्रांतीसाठी त्याच्या भ्रमाचा विच्छेद होणे हे आवश्यक आहे. ज्या ज्या वेळेस मानवाने किंवा कोणत्याही जिवितांने उत्क्रांतीसाठी पाउल उचलले त्या त्यावेळी अवतार झालेले आहेत. आपणास माहीतच आहे की श्री विष्णू श्रीरामअवतार घेऊन वनात फिरले. तसेच मानवाला समजवण्यासाठी एक आदर्श राजा कसा असावा याचे सुंदर नाटक त्यांनी प्रदर्शित केले. अशाच प्रकारे श्रीकृष्णाचे जीवन होतं. आणि त्याचप्रमाणे श्री येशुख्रिस्ताचे जीवन होय.

श्री ख्रिस्तांच्या जीवनाकडे नजर टाकल्यास एक गोष्ट फार प्रकर्षाने निदर्शनास येते. ती म्हणजे त्याकाळच्या समाजाच्या लोकांतील महामुर्खपणा, ज्यामुळे ही महान व्यक्ति सुळावर चढवली गेली. इतकी मुर्खता की, त्यावेळी एका चोरास गुन्हेगाराला सोडून द्यावे की, श्री ख्रिस्तांना? असा लोकांना सवाल केला असता तेथील ज्यू लोकांनी चोराला सोडून द्यावे व श्री ख्रिस्तांना फाशी द्यावे, अशी मागणी केली. आज ह्याच लोकांची काय परिस्थिती आहे हे आपणास माहित आहे. त्यांनी जे पाप केलेलं आहे, ते अनेक जन्मात फिटणार नाही, धुतलं जाणार नाही. अजूनही अशी मंडळी अहंकारात गुरफटलेली आहेत. त्यांना वाटले की आम्ही फार मोठ पुण्यकर्म केले. अजूनही जर लोकांनी परमेश्वराजवळ क्षमा मागितली की हे परमात्मा तुमच्या पवित्र तत्वाला फाशी दिल्याबद्दल आम्हाला क्षमा करा. आपले पवित्र तत्व नष्ट केले त्याबद्दल आम्हला क्षमा करा. तर परमेश्वर लोकांना लगेच क्षमा करील. परंतु मानवाला क्षमा मागणे म्हणजे फार कठीण गोष्ट वाटते. तो अनेक दुष्टता करुन जातो. अशी जगात किती माणसं आहेत की, ज्यांनी संतांचे पुजन केलं आहे. आपण श्री गुरुनानकांच उदाहरण घ्या. पदोपदी त्यांना लोकांनी सतावले आहे. श्री कबीरांच उदाहरण घ्या. या जगात लोकांनी आजपर्यंत प्रतयेक संतांना दु:खाशिवाय दुसरं काहीच दिलं नाही. पण मी आता सांगु इच्छिते की, जग आता बदलले आहे. सत्ययुगाची सुरुवात झाली आहे. आपण प्रयत्न करुन पाहु शकत. आपण कोणाही संतांना साधुंना आता त्रास देऊ शकणार नाही. याचे कारण श्री ख्रिस्तच आहेत. श्री ख्रिस्तांनी जगांत फार मोठी शक्ती संचारीत केली आहे की, ज्यामुळे संताना त्रास देणाऱ्या दुष्ट मंडळींना कष्ट भोगावे लागतील, त्यांना शिक्षा होईल. श्री ख्रिस्ताचे एकादशरुद्र आज पूर्णतया सज्ञ आहेत आणि त्यामुळेच जे कोणी साधुसंतांना त्रास देतील त्यांचा सर्वनाश होईल. कोणत्याही महात्म्यास सतावणे हे महापाप आहे. आपण श्री येशुख्रिस्तांच्या उदाहरणावरुन पूर्णपणे समजुन घ्या अशा प्रकारची मूर्खता करु नका. जर अशी मूर्खता आपण परत केली तर आपला कायमचा सर्वनाश होईल.

श्री ख्रिस्ताच्या जीवनातुन शिकण्यासाठी फार मोठी गोष्ट असेल तर ती म्हणजे ठेविले अनंते तैसेचि रहावे. त्यांनी आपला व्यवसाय कधी बदललानाही. त्यांनी स्वत:ला कधी वैरागी समजून समाजातुन दूर ठेवल नाही. उलट ते काही लग्न समारंभास गेले तेथे त्यांनी स्वत: लग्नाची व्यवस्था केली. एकदा तर लग्नाच्या

वेळी पाण्यापासून त्यांनी द्राक्षाचा रस निर्माण केला, असे वर्णन बायबलमध्ये आहे. आता माणसाने फक्त हाच एक विषय त्यातला निवडून काढला की श्री ख्रिस्तांनी पाण्यापासून वाइन बनविली, म्हणजे ते दारु पीत होते. आपण जर हिब्रू भाषेचा अभ्यास केलात तर लक्षात येईल की, वाइन ह्या शब्दाचा अर्थ शुध्द ताज्या द्राक्षाचा रस. त्याचा अर्थ दारु होत नाही.

श्री ख्रिस्ताचे कार्य होते की, आपले आज्ञाचक्र मोकळे करुन आपला अहंकार विरघळवायचा. माझे कार्य आहे कि मी आपली कुंडलिनी शक्ती जागृत करुन आपल्या सहस्त्राचराचे तिच्याद्वारे छेदन करणे हे समग्रतेचे कार्य असल्यामळे हे कार्य प्रत्येकाच्या बाबतीत मला करावयाचे आहे. मला समग्रतेत श्री ख्रिस्तांबद्दल, श्री गुरुनानकांबद्दल, श्री जनकांबद्दल व अशा अनेक अवतारांबद्दल सांगावयाचे आहे. त्याप्रमाणे मला श्रीकृष्ण, श्रीराम इत्यादी अवतारांबद्दलही सांगावयाचे आहे त्याप्रमाणे श्री शिवांबद्दल कारण की, या सर्व देवदेवतांच्या शक्ति आपणामध्ये आहेत. आता समग्रता घडून येण्याची वेळ आली आहे.

जे परमेश्वर शोधत आहेत त्या सर्वांना परमेश्वर प्राप्ति कलियुगातच मिळेल व हे कार्य बहुसंख्यीय लोकांना करण्यास मिळेल व याचा सर्व न्याय कलियुगातच होईल. सहजयोग हा अखेरीचा निवाडा आहे.

ह्या बद्दल बायबलामधे वर्णन केले आहेसहजयोगात आल्यानंतरच आपला न्याय किंवा निवाडा होतो. परंतु आपण सहजयोगांत आल्यावर समर्पित होणे आवश्यक आहे. कारण की, सर्व काही मिळाल्यावर त्यात टिकून रहाणं व जमून बसणे, त्यांत स्थिर होणे, हे फार महत्वाचं आहे. बरेच लोक मला विचारतात, माताजी आम्ही स्थिर केव्हा होणार? हा प्रश्न असा आहे की समजा एखाद्या नावेत बसुन जात आहात. नाव स्थिर झालेली आपणास उमगते. किंवा असे समजा आपण दुचाकी सायकल चालवित आहोत ती चालवतांना ज्यावेळेस आपण डगमगत नाही व स्थिर होतो ते जसे कळते तसेच, सहजयोगात येऊन आपण स्थिर झाल्याचं कळतं. हा न्याय ज्याचा त्यानेच म्हणजे स्वतःच करावयाचा आहे. ज्यावेळेस सहजयोगात येऊन आपण स्थिर होतो, त्यावेळेस निर्विकल्पता प्रस्थापित होते. जो पर्यंत कुंडलिनीशक्ती आज्ञाचक्र उल्लंघून पुढे जात नाही, तोपर्यंत निर्विचार स्थिती प्राप्त होत नाही. साधकांत निर्विचारता प्रस्थापित होणं ही साधनेतील पहिली पायरी आहे. ज्यावेळेस कुंडलिनीशक्ती आज्ञाचक्राचे उल्लंघन करते, त्यावेळेस निर्विचारता लगेच प्रस्थापित होते. आज्ञाचक्राच्या वर असलेले सूक्ष्मव्दार श्री येशुख्रिस्तांच्या शक्तीमुळेच कुंडलिनी शक्तीसाठी खुले केले जाते व हे व्दार खुलण्यासाठी श्री ख्रिस्तांची प्रार्थना दीलॉर्डस् प्रेअर म्हणावयास लागते. हे व्दार उल्लंघून गेल्यानंतर कुंडलिनी शक्ती आपल्या मेंदूमधील ज्यास लिंबिक ऐरिया म्हणतात, त्यात प्रवेश करते. यालाच परमेश्वराचं साम्राज्य म्हणतात, कुंडलिनीने या साम्राज्यात प्रवेश केल्यानंतरच निर्विचार स्थिती येते. या मेंदूमधील लिंबिक ऐरिया ह्या भागांत आपल्या शरीरात असलेल्या सातही मुख्य चक्रांना व इतर उपचक्रांना चलीत करणारी चक्रे असतात.

आता आज्ञाचक्र कोणत्या कारणांमुळे खराब होते ते पाहू या. आज्ञा चक्र बिघडण्याचे मुख्य कारण आपले डोळे. मनुष्याने आपल्या डोळ्यांची फार निगा घ्यावयास हवी कारण की, डोळे फार महत्वपूर्ण आहेत. दुसरे कारण आपण आपला माथा कोणाही अनअधिकारी व्यक्तिसमोर किंवा वाईट ठिकाणी टेकवल्यामुळे आज्ञाचक्र खराब होते. ह्यासाठीच श्री ख्रिस्तांनी सांगितले होते की आपला माथा वाटेल तेथे झुकवायचा नाही. कारण की, असे केल्याने अजाणतेपणाने आपण जे कमावलेले असते ते त्यासमोर गमावून बसतो.

फक्त परमेश्वरी अवतार असलेल्या व्यक्ती समोरच माथा टेकवला पाहिजे. दुसऱ्या कोणाही माणसासमोर आपले डोके टेकवायचे नाही. हे फार महत्वपूर्ण आहे. आपण आपले डोके कुठे चुकीच्या ठिकाणी टेकवले तर लगेच आपले आज्ञाचक्र पकडले जाणार. सहजयोगात आमच्या पहाण्यात आले आहे की, आजकाल इतर अनेकजणांची आज्ञाचक्रे खराब असतात. याला कारण चुकीच्या ठिकाणी डोकं टेकवणं किंवा चुकीचे गुरु केल्यामुळे सुध्दा आज्ञाचक्र बिघडते डोळ्याचे कित्येक रोग वरील अनेक कारणांतच होतात.

हे चक्र स्वच्छ ठेवण्यसाठी मनुष्याने नेहमी अत्यंत पवित्र गोष्टींचे वाचन केले पाहिजे. अपवित्र गोष्टी मुळीच वाचता कामा नयेत. बऱ्याच जणांना असं वाटतं की, त्यात काय झालं? किंवा आमचा धंदा असल्यामुळे काही गोष्टी कराव्या लागतात. परंतु अशा अपवित्र गोष्टींमुळे डोळे बिघडतात. मला हे समजत नाही, ज्या गोष्टी खराब असतात त्या गोष्टी माणसं का करतात? एखाद्या अपवित्र किंवा गलिच्छ माणसाकडे बघितल्या नंतरसुध्दा आज्ञाचक्र बिघडू शकते. श्री ख्रिस्तांनी फार जोरात ठासून सांगितले होते की, 'तुम्ही व्यभिचार करु नका. पण मी तुम्हाला सांगतो की, तुमची नजरदेखील व्यभिचारी असता कामा नये (Thou shall not commit adwltery. But I tell you thou shall not have adultrov seyes) त्यांनी इतकं ठासून सांगितलं होतं की, जर आपली नजर अपवित्र असेल, तर आपल्याला डोळ्यांचा त्रास होणार व डोळे कमकुवत होणार. याचा अर्थ असा नाही की, आपल्याला चष्मा घालावयास लागत असेल तर आपण अपवित्र किंवा गैर व्यक्ति होतो. परंतु काही वयानंतर चष्मा लावावाच लागतो हा जीवनाचा नियम आहे. परंतु डोळे खराब होतात ते आपली नजर स्थिर न ठेवल्यामुळे व एका ठिकाणाहून दुसरीकडे सारखी नजर फिरवल्यामुळे. काही लोकांचे चित्त सारखं एका ठिकाणाहून दुसरीकडे धावत असतं, अशा लोकांना हे कळत सुध्दा नाही की, आपले डोळे अशा प्रकारे एकसारखी नजर एका ठिकाणाहून दुसरीकडे फिरवल्यामुळे ,बिघडत असतात. आज्ञाचक्र बिघडण्याचे दुसरे कारण म्हणजे माणसाची कार्यपध्दती. समजा

आपण पुष्कळ काम करता, फारच अती कर्मी आहात व आपण चांगली कामे करत आहात, कुठलंही वाईट कार्य करत नाही. तर अशा अतीकर्मामुळे मग ते अती वाचन असो की, अती शिवणकाम असो की अतिशय अभ्यास असो की, मग अती विचार असो, आज्ञाचक्र बिघडते. याचे कारण असे की, ज्यावेळेस तुम्ही अतीकर्म करता, त्यावेळेस तुम्ही परमेश्वराला विसरता. त्यावेळी आपणामध्ये ईश्वरप्रणिधान स्थित होत नाही.

कुंडलिनी ही अत्यंत सत्य व पवित्र गोष्ट आहे. ही काही ढोंगबाजी किंवा दुकानात विकत मिळेल अशी वस्तु नाही. हे अत्यंत सत्य आहे जोपर्यंत आपण सत्यात उतरणार नाही, तोपर्यंत आपण हे जाणू शकणार नाही. वाममार्गाचा अवलंब करुन आपण सत्याला ओळखू शकणार नाही. ज्यावेळस आपण सत्याशी एकाकार व्हाल, तादात्म्य पावाल तेव्हाच आपणास कळेल की, सत्य काय आहे. त्यावेळेस आपणास समजेल की, आपण परमपिता परमेश्वराचे एक साधन आहेत, ज्यामधून परमेश्वरी शक्तीचे वहन होत आहे. जी परमेश्वरी शक्ती साऱ्या विश्वात पसरली आहे, साऱ्या विश्वाचं संचालन करते, त्याच परमेश्वराच्या प्रेमशक्तीचे आपण साधन आहोत. यात श्री ख्रिस्ताचे किती मोठे बलिदान आहे? कारण की, त्याच्यामुळेच आपले आज्ञाचक्र उघडले गेले, आपले आज्ञाचक्र उघडले नाही, तर कुंडलिनीशक्तीचे उत्थापन होणार नाही, कारण की, ज्या माणसाचे आज्ञाचक्र पकडले आहे, त्याचे मुलाधारचक्र सुध्दा पकडलडे जाते जर एखाद्या व्यक्तिचे आज्ञाचक्र फारच पकडले असेल तर त्या व्यक्तिची कुंडलिनीशक्ती कोणत्याही कारणाने जागृत होणार नाही. आज्ञाचक्रवरील पकड सोडवण्यासाठी आम्ही कुंकु लावतो त्यामुळे अहंकार व आपल्या अनेक विपत्ती दुर होतात. जेव्हा तुमच्या आज्ञाचक्राच्या ठिकाणी कुंकु लावले जाते, त्यावेळी आपले आज्ञाचक्र उघडते व त्यामुळे कुंडलिनीशक्ती वर जाते. इतका गहन संबंध कुंडलिनी शक्ती व श्री ख्रिस्त यांचा आहे. जे श्री गणेश, मुलाधारचक्रावर स्थित राहून आपल्या कुंडनी शक्तीच्या लज्जेचे रक्षण करतात, तचे श्री गणेश आज्ञाचक्रावर त्या कुंडलिनी शक्तीचे व्दार खुले करतात.

हे चक्र ठीक ठेवण्यासाठी आपण काय केलं पाहिजे? त्यासाठी अनेक मार्ग आहेत. कुठल्याही अतिशयतेमुळे समाज दुषित होऊ शकतो व म्हणूनच कुठल्याही प्रकारची अतिशयता अयोग्य आहे. संतुलितपणामुळे आपल्या डोळ्यांनासुध्दा विश्रांती मिळते. सहजयोगात यासाठी बरेच उपचार आहे. परंतु यासाठी प्रथम पार होणे आवश्यक आहे. त्यानंतर डोळ्यांसाठी अनेक प्रकारचे व्यायाम आहेत की, ज्यामुळे आपले आज्ञाचक्र सुध्दा ठीक राहू शकते. त्यापैकी एक म्हणजे आपला अहंकार आपण पहात बसणे व स्वतःशीच विचार करायचा की; महाराज काय विचार आहे, कुठं निघालात? स्वतःला अशा प्रकारे आरशात पाहून संबोधिल्यामुळे आपण आपला अहंकार पाहु शकाल व अहंकारामुळे डोळ्यावर येणार ताण कमी होईल.

आता दुसरी बाजू आहे ती आज्ञाचक्राच्या मागील बाजूस म्हणजे आपल्या कपाळाच्या बरोबर मागे, मानेच्या वर जवळजवळ एकवीत किंवा ८ बोट वर हया भागास श्री महागणेशांचा भाग म्हणतात. श्री गणेशांनी श्री महागणेशाचा अवतार घेतला तोच तो श्री ख्रिस्ताचा अवतार होय. श्री ख्रिस्ताचे स्थान मधोमध असून त्यांच्या सभोवार अकरा रुद्राचे राज्य आहे व या राज्याचे प्रभुत्व श्री ख्रिस्तांकडे आहे. हयाएकादश रुद्रात श्री महागणेश व श्री षडानन सुध्दा आहेत. कुंडलिनी जागृत झाल्यानंतर जर आपण क्षणभर डोळे उघडले तर काही वेळ आपणास सभोवार सर्व अंधुक अंधुक दिसेल कारण की ज्यावेळी कुंडलिनी शक्ती जागृत होते त्यावेळी आपली बुबळे विस्फारीत होतात व चंद्रावतात ज्याला (Dialatotion of pupils) असे वैद्यकीय शास्त्रात म्हणतात व ही प्रक्रिया पॅरॅसिम्पथॅटीक नर्व्हस सिस्टिम मुळे होते.

ख्रिस्तांच्या नुसत्या चिंतनाने मननाने किंवा ध्यानान आपले आज्ञाचक्र ठीक होऊ शकते. परंतु त्याच्या बद्दल त्यांच्या जीवनानंतर ज्या रुढी किंवा प्रणालिका बनविल्या आहेत, त्यांचे अनुकरण म्हणजे श्री ख्रिस्ताचे मनन नव्हे.

आता काही गोष्टी ज्या सनातन आहेत त्या मी तुम्हास सांगणार आहे. प्रथम म्हणजे एकाही स्त्रीकडे वाईट दृष्टीने पहाणे म्हणजे महापाप आहे. आपणच विचार करा की, रात्रंदिन जे लोक रस्त्यावरील अनेक स्त्रियांकडे वाईट नजरेने पहातात ते किती महापाप करीत आहेत? श्री ख्रिस्तानी या गोष्टी २००० वर्षापूर्वी आपणास सांगितल्या. परंतु त्यांनी या गोष्टी उघड करुन सांगितल्या नव्हत्या आणि म्हणूनच मी त्या गोष्टी परत आपणास सांगत आहे. श्री ख्रिस्तांनी हयाच गोष्टी सांगितल्या पण आपण त्यांना सुळी दिले श्री ख्रिस्तांनी एवढंच सांगितलं होतं की, ही गोष्ट करु नका. कारण की ही गोष्ट घाणेरडी आहे पण हे केल्याने काय होते ते त्यांनी सांगितले नव्हते. वाईट नजर ठेवल्याने त्याचे दुष्परिणाम काय होतात हे श्री ख्रिस्तांनी सांगितले आहे. त्यामुळे मनुष्य एखाद्या पशुसारखा वागू लागतो कारण की, रात्रदिन त्याच्या मनात घाणेरडया विचारांची चक्रे चालू असतात यासाठी आपल्या योगशास्त्रात लिहिले आहे की, आपली चित्तवृत्ती सावरुन धरा. व चित्त योग्य मार्गावर ठेवा. आपले चित्त ईश्वरा प्रती नतमस्तक ठेवले पाहिजे. आम्ही योगापासून बनविले गेलो आहेत आमची भूमी योगभूमी आहे. आम्ही अहंकारवादी नाही. किंवा आम्हास अहंकार होणेही नव्हे . आम्हाला अहंकारवदिता नको आहे. आम्हाला या योगभुमीवर योग्याप्रमाणे रहायचं आहे. एक दिवस असा येईल ज्यावेळी आम्हा सर्वांना योग प्राप्त होईल त्यावेळी सारे जग या देशाच्या चरणावर लोळण घेईल. त्यावेळेस लोकांना कळेल की, श्री ख्रिस्त कोण होते, कुठून आले व त्यांचे यथायोग्य प्रकारे या पवित्र भूमिवर पूजन होईल.आपल्या पवित्र भारतभूमीत आजही 'स्त्री ' ची लज्जा राखली जाते व त्यांना सन्मानाने वागवले जात आहे. आपल्या देशात आपण आईला मानतो. इतर देशातील

मंडळी जेव्हा भारतात येतील त्यावेळी त्यांना कळेल की, श्री ख्रिस्ताचा खरा धर्म भारतात अत्यंत आदराने पाळला जात आहे, ख्रिश्चन धर्माच्या राष्ट्रात नव्हे.

श्री ख्रिस्तांनी म्हटलं आहे की, आपला दुसऱ्यांदा जन्म व्हायपास पाहिजे किंवा आपण द्विज व्हावयास हवे. मनुष्याचा दुसरा जन्म फक्त कुंडलिनी जागृतीमुळेच होऊ शकतो. जोपर्यंत एखाद्याची कुंडलिनी शक्ती जागृत होणार नाही, तोपर्यंत तो पुनर्जन्मास प्राप्त होणार नाही. जो पर्यंत आपला दुसरा जन्म होणार नाही, तोपर्यंत आपण परमेश्वराला ओळखू शकणार नाही. आपण सर्वांनी पार झाल्यावर बायबल वाचावे. आपणास आश्चर्य वाटेल की, त्यात श्री ख्रिस्तांनी सहजयोगाची महती सांगण्याव्यतिरिक्त दुसरं काहिही सांगितलेलं नाही. एकेक गोष्ट इतकी बारीक आणि सूक्ष्म सांगितली आहे. ज्या लोकांना दृष्टी नाही, ते या सर्व गोष्टींचा विपर्यास करीत आहेत.

खऱ्या अर्थाने बाप्तिस्मा देणे म्हणजे कुंडलिनीशक्ती जागृत करुन सहस्त्रारापर्यंत आणणे व त्यानंतर आपल्या सहस्त्राराचे छेदन होऊन परमेश्वरी शक्ती व आपली कुंडलिनी शक्ती यांचा संयोग घडवून आणणे. म्हणजेच कुंडलिनी शक्तीवरील जे अखेरचे कार्य आहे. परंतु हया पादऱ्यांना बाप्तिस्मा देणे हयाची पुसट सुध्दा कल्पना नाही. उलट ते अनधिकार चेष्टा करीत आहेत. नाहीतर मग असे पाद्री भूत (दयेच्या) कामांत गुंतलेलं आढळतील. गरीबांची सेवा करा. रोग्यांची सेवा करा इत्यादी आपण म्हणाल की, माताजी हे तर चांगलं कार्य करत आहेत. हो चांगलं परंतु हे परमेश्वराचे कार्य नाही. परमेश्वराचे हे काम नाही की पैसे देऊन गरिबांची सेवा करणे परमेश्वराचे कार्य तुम्हाला त्याच्या साम्राज्यात घेऊन जायचे नि त्याच्याशीच भेट करुन द्यायची. त्यांना सुख शांती, समृध्दि, शोभा व ऐश्वर्य या सर्वांनी परिपूर्ण करावयाचे हे परमेश्वराचे कार्य आहे. एखादा मनुष्य चोरी करतो किंवा खोटे बोलतो, किंवा गरीब म्हणून भटकतो परमेश्वर अशा माणसाचे जाऊन पाय पकडणार नाही. हे (भूत) दयेचे काम आहे ते एखाद्या माणसाने करावे हे तुम्ही पूर्णपणे समजून काही ख्रिस्ती लोक धर्मांतराचे कार्य करताना आढळतील. कोठे आदिवासी माणसे असतील तेथे जातील. तिथे काही सेवेचे काम करतील. मग सर्वांना ख्रिश्चन बनवतील. परंतु एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, हे परमेश्वराचे कार्य नव्हे. परमेश्वराचे कार्य अबाधित आहे.

सहजयोगात लोकांची कुंडलिनी जागृत करताच लोक बरे होतात. आम्ही सहजयोगात दिखाऊ भूतदयेचे कार्य करीत नाही. पण जर कधी आम्ही कुठे हॉस्पिटलमधे गेलो तर २५/३० रोग्यांना सहज बरे करु शकतो. त्यांची कुंडलिनी जागृत करताच ते आपोआप बरे हाऊ शकतात, कारण की, आमची प्रेमशक्ती आहे. त्यामुळे रोग्यांची कुंडलिनी जागृती होताच त्यांच्यामधून शक्ती वाहू लागते व त्यामुळे ते बरे होतात. श्री ख्रिस्तांनी सुध्दा अनेक लोकांना बरे केले. ते त्यांच्यामधून वहाणाऱ्या प्रेमशक्तीमुळे. श्री ख्रिस्त कधी कोणाची पादसेवा करण्यास जाऊन बसले नव्हते हया गोष्टी आपण सूज्ञपणे समजणे आवश्य आहे. ज्या गोष्टी पूर्वी चुकीने केल्या आहेत त्याची पुनरावृत्ती करु नका. आपण स्वतः साक्षात्कार मिळवून घ्या. हे आपलं मुख्य कार्य आत्मसाक्षात्कार झाल्यांनतर आपणामधील शक्ती जागृत होतात. त्यामुळे सहजयोगात कर्करोगासारखे असाध्य रोग बरे झालेले आहेत, किंबहुना आपण कोणालाही रोगमुक्त करु शकता. कर्करोगासारखे असाध्य रोग फक्त सहजयोगामुळेच बरे होऊ शकतात. पण लोक बरे झाल्यावर आपल्या पूर्वीच्या मार्गावर परत जाता. ती मंडळी परमेश्वराना शोधत नाहीत. अशा लोकांना त्यांचा रोग बरा होण्यापुरता परमेश्वर आठवतो. त्यांना असे वाटत नाही की, आपण परमेश्वराला प्राप्त करणे आवश्यक आहे. जो माणूस परमेश्वराचा दीप बनू इच्छित नाही, अशा लोकाना परमेश्राने का बरे करावे? अशा माणसांना ठीक केले काय किंवा नाही, त्यांच्यापासून जगाला प्रकाश मिळणार नाही. परमेश्वर असे दीप लावील ज्यामुळे सर्व जगात प्रकाश पसरेल. परमेश्वराने मूर्ख लोकांना ठीक कशाला करावयाचे? ज्या माणसात परमेश्वराचं कार्य करण्याची इच्छा नाही, परमेश्वर प्राप्तीची इच्छा नाही. अशा लोकांना परमेश्वराने मदत का करावी? ज्यांना गरिबांसाठी कार्य करायचे आहे. सामाजिक कार्य करायचं आहे, त्यांनी त्याचा संबंध परमेश्वराच्या कार्याशी लावु नये. काही लोक इतक्या निम्नस्तरावर परमेश्वराचा संबंध लावतात की, एके ठिकाणी मी पाहिजे की, दुकानाची पाटी 'साईनाथ बिडी' अशी होती अशा प्रकारे परमेश्वराची चेष्टा करणे, म्हणजे सरांस परमेश्वराचा अपमान आहे. सर्व गोष्टीचे प्रमाण असले पाहिजे, मर्यादा असली पाहिजे. प्रत्येक गोष्टीचा परमेश्वराशी संबंध लावून आपण महापाप करत असतो हे समजले पाहिजे. साईनाथ बिडी किंवा लक्ष्मी हींग म्हणजे परमेश्वराची चेष्टा आहे आणि असे केल्याने लोकांना काय लाभ होतो? काही लोक म्हणतात 'माताजी' यामुळे आमचं 'शुभ झालं' शुभ म्हणजे काय, तर जास्त पैसे मिळाले अशा प्रकार धंदा केल्यास त्याचा त्रासच होईल. अशामुळे परमेश्वराचा अपमान होतो. श्री ख्रिस्त सर्व मानव जातीच्या कल्याणार्थ आणि उध्दारार्थ जन्माला आले होते. ते काही कुणाची वैयक्तिक संपदा म्हणून नव्हते. ते स्वतः ॐकार रुपी प्रणव होते. सत्य होते. परमेश्वराचे इतर जे अवतार झाले त्यांची शरीरे पृथ्वीतत्वांपासून बनविली होती. परंतु श्री ख्रिस्ताचे शरीर प्राणतत्वापासून बनवले गेले होते आणि म्हणूनच त्यांचे मृतपुनरास्थापन झाले. व हे मृतपुनरास्थापन झाल्यानंतरच त्यांच्या अनेक शिष्यांचा डोक्यात प्रकाश पडला की, ते साक्षात परमेश्वर होते. व नंतर मग धावाधाव सुरु झाली. मग त्यांच्या नावाचा मंत्रोच्चार वगैरे सुरु झाला. मग ती मंडळी नाना प्रकारची भाषणे देऊ लागली. तात्पर्य परमेश्वराचा अवतार आलेला असताना त्या अवतारास ओळखून लोकांनी आपली आत्मान्नती केल्यास सचहूकडे आनंदी आनंद होईल. आपण सर्वजण परमेश्वराच्या योगास प्राप्त व्हा. अनंत आशिर्वाद.

# कुंडलिनी आणि श्री शिवशक्ती व श्री विष्णूशक्ती

(२४ सप्टेंबर १९७९ रोजी अमरहिंद मंडळात श्री माताजींनी केलेल्या भाषणाद्वारे)

शिवशक्तीचा मेळ जिवाशी झालेला नाही जेव्हा हा मेळ घटित होतो, तेव्हाच योग घडून येतो. शिव वेगळा हृदयामध्ये क्षेत्रज्ञ म्हणून वावरत असतो. म्हणजे क्षेत्राला जाणणारा. आपल्यात असा कोणीतरी आहे की, आपण जे काही करत असतो ते तो जाणत असतो. आपल्याला हे माहित आहे की, जर आपण आपल्याला ठकवण्याचा प्रयत्न केला किंवा जरी आपण आपल्याबरोबर कितीही प्रतारणा केली, तरीसुध्दा आपल्या हृदयात ते कोणीतरी जाणत आहे. आणि त्याला जाणणारा तो 'शिव' आपल्या हृदयात आत्मस्वरुप बसलेला आहे जोपर्यंत शिवशक्तीचा आणि ह्या आत्म्याचा योग घडत नाही, तोपर्यंत, त्या दोन्ही शक्ती वेगळ्या समजल्या पाहिजेत. आत्म्याची जी शक्ती आहे ती म्हणजे साक्षीस्वरुप, ती चिन्मय आहे. ती अनंत आहे. ती कधीही बिघडु शकत नाही. तिला तुम्ही मारु शकत नाही. आत्मा हा निर्लेपात आहे. तो कशालाही लपटत नाही. तो वेगळा असतो. सगळे काही बघत असतो.

मी कधी कधी एखादे उदाहरण देत असते की, गॅस लाईटमध्ये एखादा लहानसा दिवा पेटत असतो. किंवा एक लहानशी ज्योत असते तशीच आपल्या हृदयामध्ये जी ज्योत आहे, तो एक आत्मा आहे. ती कोंडलेली ज्योत अथवा ते जागृत, ज्योतिर्मय जे आहे, तो आत्मा आहे. बाकी सुप्तावस्थेत म्हणजे त्यांच्यात जाग नाही. जागृती आलेली नाही. जागृतीचा अर्थ असा आहे की, आपला जो जागतिक स्वभाव आहे किंवा आपली जी सामूहिक चेतना आहे, त्याला प्राप्त होणे. ज्याला 'अलख' म्हणतात किंवा 'परोक्ष' म्हणतात. ते आपल्या चित्तामध्ये जागृत होणे म्हणजे जागृती. म्हणजे वर म्हटल्याप्रमाणे गॅस लाईटमध्ये एक लहानशी ज्योत पळत असते आणी त्याच्यामध्ये गॅसचा एक मोठा स्रोत जाऊन त्या ज्योतीला भिडतो, तो सबंध गॅस एक मोठी प्रज्वलीत गॅस लाईट होते. तशाच त-हेने हे योगाचे आहे. पण हा जो गॅस नळ्यांमधून वाहतो, त्याला आपण सुप्त म्हणू. कारण अजून प्रज्वलित झालेला नाही. म्हणून तो सुप्त आहे. प्रज्वलित फक्त ती लहानशी ज्योत आहे आपल्या हृदयामध्ये आत्मास्वरुप ती जागृत आहे. बाकी सुप्तावस्थेत आहे. कुंडलिनी आपल्यामध्ये जी बसलेली आहे ती शिवशक्ती आहे. महाकालीची शुध्दशक्ती आपल्या कुंडलीनीमध्ये बसलेली असते. इच्छा आपण वापरलेली नाही व शुध्द स्वरुप आहे ती कुंडलीनीमध्ये बसलेली असते. जेव्हा ही कोणत्याही संयोगाने किंवा संकल्पाने जागृत होते, तेव्हा ती वर जाऊन सदाशिवाच्या स्थानाला भिडते. तेव्हा हृदयात बसलेल्या त्या आत्म्याला तो स्पार्क मिळतो, आणि त्या स्पार्कमुळे ही शक्ती प्रज्वलित होते. तेव्हा शिवशक्ती जी आहे, ती आत्म्याची शक्ती नव्हे, पण ती एका अर्थाने आत्म्याची शक्ती आहे कारण सुरवातीला जर आपण पाहिले, तर परमेश्वर आणि परमेश्वरी शक्ती ह्या दोन्ही एकच आहेत. सूर्य आणि सूर्याचे किरण किंवा चंद्र आणि चंद्राचे किरण हे दोन नाहीत त्याचप्रमाणे परमेश्वरा आणि त्याची शक्ती ह्या दोन वस्तु नाहीत. पण मानवाच्या बुध्दीला हे समजत नाही की, दोन वस्तु एकाकार आहेत, पण त्या आपल्या एकमेकापासुन वेगळ्या झालेल्या आहेत. कारण त्यांच्यामध्ये सृजन घडत आहे. जर ती परमेश्वरामध्ये समावली, तर काहीही सृजन घडत नाही, आणि 'पुर्णब्रम्ह स्थापित होते तेव्हा सगळी सृजन क्रिया होते. ह्याच शिव शक्तीतुन एकाकार कुंडलिनी आधी बनते. त्याच्यानंतर शिवशक्तीतुनच क्रिया शक्ती निघते. क्रियाशक्ती आणि शिवशक्तीच्या मेळानी, नंतर आपल्यामध्ये विष्णुशक्ती निघते. विष्णुशक्ती ही ज्ञानशक्ती आहे म्हणजे जे आपल्या जाणिवेत आले त्याला ज्ञान म्हटले पाहिजे. पुस्तकी ज्ञानाला ज्ञान म्हणत नाही.

जेव्हा मनुष्य परमेश्वराच्या शोधात फिरतो तेव्हा म्हटल पाहिजे की, त्याचं विष्णुतत्व पूर्णपणे जागृत झालेलं आहे. जर हे विष्णुतत्व त्याच्यात पूर्णपणे जागृत झालेलं नसेल तर सहजयोग जरा कमी प्रतीचा होतो.

आता ही विष्णुशक्ती आपल्या सर्वांच्या पोटात आहे, आणि विष्णुशक्तीनी धारण होते. आपल्यामध्ये धर्माच्या इतक्या विकृत कल्पना आलेल्या आहेत. तशा त्या नसून अत्यंत शाश्वत आणि सनातन आहेत. त्या काही कल्पना नाहीत, पण वास्तविकता आहेत म्हणजे कार्बनच्या जर चार अणुभार आहेत तर त्या सर्व कार्बनला चारच अणुभार असणार. जर सोन्याचा रंग पिवळा आहे आणि जो जर खराब होत नाही तर हा धर्म त्या सोन्याचा आहे. प्रत्येकाला आपला आपला धर्म मिळालेला आहे (विंचू, साप) तो विष्णुशक्ती म्हणून आहे. हा धर्म उगळत उगळत आज मानवस्थितीत आलेला आहे. मानवासाठी दहा धर्म सांगितलेले आहेत. ते दहा धर्म मानव असताना असायलाच पाहिजेत आणि जे जर नसेल, तर तो मनुष्य धर्मातून च्युत होतो. म्हणजे तो मानवच रहात नाही. एक तर तो राक्षस तरी होतो किंवा तो जनावर तरी होतो. मानव रहाण्याठी ते दहा धर्म पोटात सांगितले आहेत. ही अगदी खरी गोष्ट आहे आता दहा धर्मांचे रक्षण करण्यासाठी एक दुसरी

व्यवस्था परमेश्वराने करुन ठेवली आहे ती मानवाला समजत नाही, की आपण ह्या धर्मात राहिले पाहिजे. विष्णुशक्तीमुळे मानव होईपर्यंत स्वतः या संसारामध्ये अवतरण घेतलेलं आहे, आपल्याला माहीत आहे का, की परमेश्वराचे अवतार झालेले आहेत, आधी आपण मासळी होता, तेव्हा मासळी रुपाने झालं आहे. मग कूर्मरुपाने झालेले आहेत (कासवरुपाने). कासवानंतर मग वराहरुपाने झालेले आहे. म्हणजे प्रत्येक ठिकाणी असं आपल्याला स्पष्टरुपाने दिसून येत की, जशी जशी एका प्राण्याची प्रगती होत गेली तसा तसा परमेश्वराने स्वतःया संसारामध्ये जन्म घेतला आणि तुम्हाला मार्गदर्शन केलेलं आहे. कारण त्यांच्याशिवाय मार्गदर्शन कोण करणार? आणि विष्णुशक्ती हीच फक्त अवतरण घेत असते. बाकीच्या कोणत्याही शक्त्या घेत नाहीत. त्यांच कारण असं आहे की अवतराणाची गरज उत्क्रांतीसाठी होत असते. आणि उत्क्रांतीसाठी जर आहे तर उत्क्रांतीचे कार्य हे विष्णुशक्तीमुळे होते. आणि म्हणून विष्णुशक्तीच नेहमी अवतार घेत असते. त्यातल्या त्यात आपण जिला महाकालीची शक्ती म्हणतो किंवा जिला आपण शिवशक्ती म्हणतो ते सुध्दा अवतार घेते. जेव्हा भक्तांवर काही संकटे येत तेव्हा देवींनी अनेकदा ह्या संसारावर येऊन आपल्या छत्रछायेने त्या भक्तांना संरक्षण दिलेले आहे. तेव्हा ती सुध्दा अवतरण घेते. पण मुख्य अवतरण जे उत्क्रांतीला मदत करते ते म्हणजे विष्णुशक्तीचे आहे.

आता विष्णुशक्तीचा जो पूर्णपणे प्रादर्भाव झालेला आहे. असं जे अवतरण आहे ते कृष्णाचे आहे. म्हणून त्याला संपूर्ण अवतरण असं म्हणतो. इतकंच नव्हे तर तो विराट आहे समजा जर हे विश्व विराटाचे आहे तर तुम्ही त्याच्यातले एक लहान पेशी आहात. ह्या पेशी आहेत, ह्या जागृत झाल्या पाहिजेत आणि ह्यांना कळलं पाहिजे की, त्या संबंधाचे (Whole) एक अवयव आहेत भाग आहेत. आणि म्हणूनच आज इथे सहजयोग आपण करत आहोत.

आता मनुष्य विशुध्दीचक्रापर्यंत आला. हे चक्र श्रीकृष्णाचे आहे. आणि सगळ्यात जास्त म्हणजे १६ पाकळ्या त्याच्यात आहेत. आणि सोळा हजार नाडया आहेत. त्या श्रीकृष्ण स्थितीला आल्यावर मानवाने आपलं डोकं वर केलं. त्याच्यातुनच मानव हा एक विशिष्ट तऱ्हेचा प्राणी झाला. आणि त्याच वैशिष्ट्य हे की त्याला मी पणा आला. मी म्हणजे अमूक. हे जे त्याच प्रत्यक घटक वेगवेगळे करणे आहे. ह्या प्रत्येक घटकाला जे परमेश्वराने वेगळे करुन टाकलेले आहे, ते एका विशेष क्रियेमुळे घडतं की, आपल्यामध्ये अहंकार आणि प्रति अहंकार दोन्ही वाढले आणि जेव्हा ह्या ब्रम्हरंध्रच्या जवळची ही जागा आहे. इथे जेव्हा ते येऊन मिळतात आणि एकावर एक पडून जातात. तेव्हा तिथे स्वस्तिक संतूलन (Balance) होते. जमा होते. जमा झाले की टाळू भरते. टाळू भरली म्हणजे तुम्ही सगळे वेगळे झालात. मग तुम्ही मानव झालात. अशा रीतीने आत हे जे ज, ब, क, ड सगळे लोक तयार झालेले आहेत हे स्वतःला वेगळे वेगळे समजतात. आम्ही वेगळे, तुम्ही वेगळे ते वेगळे आहेत, पण खरोखर तुम्ही वेगळे नाहीत. तुमच्यात एकच शक्ती आहे. आणि त्या शक्तीला प्राप्त झाल्याशिवाय ते परत तुमच्या डोक्यात तरी कसे येणार? म्हणून परमेश्वराने तुम्हाला आधी वेगळे केले आहे

मानवाला मात्र परमेश्वराने स्वातंत्र्य दिले. तुम्हाला वेगळ केलेले आहे, की आत तुम्ही थोडे स्वतः शिका. स्वतः शिकल्यानंतर मगच तुम्ही जाणू शकाल की तुम्ही त्या संबंधाचे एक अवयव आहात किंवा एक घटक आहात. आणि हा जो घटक आहे तो जेव्हा जागृत होऊन त्याच्याशी एकाकार होईल तेव्हाच त्याला आपलं पुर्णत्व प्राप्त होणार आहे. त्यानी माणसासाठी केले आहे. आणि त्यासाठी, हे कार्य होण्यासाठी ह्याच कुंडलिनी ही शक्ती-जी की शिवशक्ती स्वतःवर उठून ब्रम्हरंध्रातून छेदून वर येते, त्या वेळेला हा साक्षात्कार घटीत होतो ह्याला कोणताही दुसरा मार्ग नाही. कुणी जर सांगितलं की एकच मार्ग कसा? एकच मार्ग आहे. झाडाला अंकुर येणं हा एकचमार्ग आहे तसाच मनुष्याची कुंडलिनी जागृत होणं हा एकच मार्ग आहे. आता इतर धर्मात याबद्दल सांगितलं आहे की नाही वगैरे पुष्कळ ऊहापोह होतात. पैकी तुम्ही जर ख्रिश्चन धर्म बघितला तर त्यांच्यात नाना तऱ्हेने कुंडलिनीचे वर्णन केलेले आहे श्री ख्रिताने असं म्हटलं आहे की 'की मी दरवाजा आहे 'व ' मी रस्ता आहे. याचा अर्थ असा की श्री ख्रिस्त स्वतःच कुंडलिनीच्या मार्गातील दरवाजा आहे व रस्ता आहे. पण त्यांनी कुंडलिनी हा एक शब्द वापरला नाही; नंतर मुसलमान धर्मामध्ये कुंडलिनी बद्दल म्हटलं आहे की नाही असं जर विचारलं तर मी म्हणेन सगळं कुंडलिनीतत्व आहे. नमाज म्हणजे दुसरं तिसरं काही नाही, पण कुंडलिनी वर कशी करायची हे त्याच्यामध्ये दाखवलेले आहे. पूर्वी जेव्हा महंमदसाहेब होते तेव्हा त्यांनी सांगितले की आपले दोन्ही हात पसरुन गुडघ्याच्या सहाय्याने तुम्ही नमाज करा. तेव्हा लोक हसत होते की हे कशाला करायचे. त्यांच्याशी कुंडलिनीच्या गोष्टी आजसुध्दा आपण करु शकत नाही. मग तेव्हाची तर गोष्ट वेगळीच. स्वतः ते महंमदसाहेब दत्तात्रयाचे अवतरणच होते. पण दत्तात्रयांची इथे काय स्थिती होती, ते अगदी बघण्यासारखे आहे. म्हणून त्या लोकांनी समजून घेतलं नाही. तरी सुध्दा त्यांनी त्यांना सांगितलं की तुम्ही जर मुसलमानांचे नमाज पाडा आता नमाजचे जेवढं काही प्रकार आहेत. ते संबंध चक्रांना गति देणारे आणखी कुंडलिनी जागृत करणारे आहेत. तर ही जी दुसरी शक्ती आहे, विष्णुशक्तीच्या रुपाने आपल्यहामध्ये वास करत असते त्याला हे जे गुरु लोक आहेत, म्हणजे दत्तात्रयाचे जे रुप आहे ज्यांना आपल्या महाराष्ट्रात आपण फारच मान देतो, हे सगळे पोटामध्ये विराजित आहेत. त्याची तत्वे जागृत झाली पाहिजेत. पुष्कळ लोक दत्तात्रयांचे भक्त आहेत. पण सगळ्यांची पोट खराब आहेत. आश्चर्याची गोष्ट आहे तुम्ही दत्तात्रयाचें शिष्य म्हणजेच तुमचे पोट अत्युत्तम असायला पाहिजे

तर तुमच पोटच खराब असणार. दत्तात्रयाला आळवायला बसले दत्तात्रय काय तुमच्या घरातले नोकर नाही. दत्तात्रय म्हणजे काय? ते आम्हाला माहित आहे, म्हणून त्याचे वर्णन देखील करु शकत नाही. तेव्हा एवढ्या मोठ्या तत्वाला तुम्ही आवाहने करता, त्याच्यासाठी तुमची तयारी आहे कां? परत तुम्हाला त्याचा अधिकार आहे का? ही अनाधिकार चेष्टा केल्यामुळे गुरु सुध्दा हयाच्यात भामटे आहेत. पुष्कळसे गुरु नुसते भामटे आहेत. त्यांना मुळीच अधिकार नाही की दत्तात्रयाचे नाव सुध्दा घ्यायचे. परत ते असे सर्व अनाधिकारी गुरु दुर्गतीला जातात पण तुम्हालाही मात्र दुर्गती येते आणि अश्या रितीने तुम्ही जे दत्तात्रयाचे तत्व स्वतःमध्ये जागृत करायचे ठरविले, त्यामध्ये अत्यंत दोष आहेत. आणि हया दोषामुळे पोटामध्ये त्रास वगैरे होतात.

आता सहजयोगानंतर तुमच्या लक्षात येईल की काय दोष आहेत? त्याचं अव्दैत कस साधायचं? आणि कशा रीतीने आपल्यातले दत्तात्रेय आपल्यामध्ये जागृत करुन घ्यायचे. एकदा दत्तात्रेय आपल्यामध्ये जागृत झाले की मग धर्म आपोआप बसतो अधर्म करणं मोठे कठीण जाते. आता मुख्य म्हणजे हया गुरुलोकांनी काय सांगितलेलं आहे. ते आपण लक्षात घ्या. पहिली मुख्य गोष्ट म्हणजे मानवाला कोणतीही नशेची गोष्ट नसावी. कोणी म्हणतात की साईनाथ चिलीम पीत होते, अहो, ते तुमच्या नशा घालविण्यासाठी पीत होते. त्यांची गोष्ट वेगळी आहे. पण तुम्ही नशा करायची नाही. कोणतीही नशेची गोष्ट, मग ती तंबाखू असो किंवा दारु असो.ती तत्त्यांच्या विरोधात आहे.आता दारु कां प्यायची नाही ? त्यांनीच आपल्या धर्माला किंवा गुरुत्वाला त्रास होतो. विष्णुतत्वाला पोषक हे गुरु आहोत. परत कट्टरपणा धर्मांधता हया सर्व गोष्टी आपल्या नाभी चक्राला नुकसानकारक ठरतात. आता आपल्यामध्ये जर कट्टर लोक असतील तर हमखास त्यांना पोटाचा त्रास होणार आहे. कारण कट्टरता ही विष्णुतत्वाला फार हानीकारक आहे. इतकेच नव्हे तर गुरुतत्वसुध्दा त्याच्यामध्ये नुकसान पावते म्हणून ज्या माणसामध्ये कट्टरता आहे म्हणजे आम्ही मोठे लागून आलो. हिंदु किंवा ब्राम्हण, ख्रिश्चन किंवा मुसलमान, असे कट्टर म्हणवणारे लोक सहजयोगाला पावू शकत नाहीत. तुम्हाला काय माहित? तुम्ही आज इथे जन्माला आलात, उद्या मुसलमान धर्मात आला असता तर, किंवा चायनामधे जन्माला आला असता तर? कशावरुन तुम्ही ठरवलत की तुम्ही हेच आहात म्हणून? हिंदुस्थानात तरी तुम्ही अस म्हणू शकत नाही. भारतीय असून हिंदू असून म्हणू शकत नाही. कारण सांगितलेले आहे की, तुमचे पुनर्जन्म आहेत. जर तुमचे पुनर्जन्म आहेत तर तुम्ही पुर्वजन्मी कोण होता काय माहिती? कदाचित पुर्वजन्मी कोण होता काय माहिती? कदाचित पूर्वजन्मी तुम्ही इंग्रज असाल. आणि जे इथे मोठे साधुसंत ते आता इंग्रज म्हणून जन्माला आले असतील आणि तिथूनच एखादे वेळेला तुम्ही इथे आला असाल.

आजकालचे पुढारी पाहिले की मला अशी शंका वाटू लागते की, ते इथे आलेत की काय जन्माला? आणि त्यामुळे आपल्या लक्षात आलं पाहिजे की, आपण धर्मांबद्दल बोलतो, तेव्हा बाहय धर्मापेक्षा आतल्या धर्माकडे लक्ष दिले पाहिजे. आणि त्याची अनेक दाहरणे आपल्यामध्ये दाखविण्यासाठी आहेत. विशेषतः आपल्या अवतरणांनी दाखविले आहे. उदाहरणार्थ रामाचेच घ्या की एक भिल्लीण, तिचे दांत तुटलेले, म्हातारी, अंधोळीला वंचीत झालेली, दात घासले नसतील, अगदी म्हातारी जख्खड बाई. तिनी बोरे फोडली आणि तोंडात घालून उष्टी केली. तुम्ही एकतरी खाल का? विशेषतः आपल्या महाराष्ट्रीन लोकांना तर फारच बावडं उष्टयाचे. पण इतक्या प्रेमानी रामानी ते खाल्लीत. सीतेला म्हणाले की मी तुला एकही देणार नाही. सगळी मीच खाणार आहे. तिने म्हटलं असं काय, सगळी आपणच खाणार. मी म्हणे अशी बोर कधी खाल्लीच नाही, मला अशी चव कधी आलीच नाही तर मी हे का तुला देऊ? तर मग ती भिल्लीण म्हणते नाही नाही, माझ्या जवळ आहेत न तुमच्यासाठी, पण मी दातांनी तोडून ठेवलेली आहेत. मग त्यांना दिली मग लक्ष्मणाला राग येत होता की हा काय प्रकार आहे. त्याला नाही समजलं, हा काय प्रकार? सीतेने सांगितले खर आहे. मी कधी जन्मात अशी बोर खाल्ली नाहीत. थोडी असली तर मला द्या, माझ्या दिराला पण द्या. मग अगदी धावून लक्ष्मणाने घेतली ती बोरं असं सुंदर वर्णन केलय.

विदुराच्या घरी जाऊन जेवले श्रीकृष्ण. स्वतः गवळी जातीत त्यांनी जन्म घेतलेला होता. मग आम्ही कोणीतरी मोठे शिष्ट आहोत, असं मानायचं म्हणजे तुम्हाला हिंदूधर्म मूळातुन अगदी समजला नाही, हे दिसून येते. सर्व माणसांमध्ये एकच आत्मा आहे. आणि सर्व माणसे एकाच आत्म्याच्या भोवती फिरत आहेत. एकच परमेश्वर सगळयांच्या मध्ये नांदतो, हे अनेकदा जरी सांगितलं असलं, तरी आपण जाती पाती करुन ठेवल्या आहेत. जातीपाती हया मनुष्याच्या स्वभावामुळे असतात आणि प्रत्येकाचा स्वभाव वेगळा असतो तेव्हा हि फार आतली गोष्ट आहे. 'स्व' भाव त्या 'स्व'ला अजून जाणलं नाही. तुम्ही जाती कशा कराल? अशाच प्रकारे हे आपल्यामधील विष्णुतत्व खराब होते. म्हणजे आधीपासून आपल्या कल्पना करुन घ्यायच्या, की हे ठीक नाही ते ठीक नाही तुम्हाला कसे कळल? हे कस तुम्ही ओळखणार ?

त्याच्यासाठी आधी तुमच्यामध्ये विष्णुतत्व जागृत व्हायला पाहिजे. ते तुमच्या नाभीचक्रात आहे. नाभी चक्रातले विष्णुतत्व जर जागृत झालं, तर त्याच्यापुढे स्वाधिष्ठान चक्रावरती मी आपल्याला काय सांगितलेले आहे की ही क्रियाशक्ती स्वाधिष्ठान चक्रावर चाललेली आहे. तेव्हा ज्या लोकांना अतिकर्म करायची सवय लागलेली असते त्या लोकांना स्वाधिष्ठान चक्राचा फार जास्त त्रास होतो. कारण सगळी शक्ती विष्णूतत्वातुन ती स्वाधिष्ठान चक्रात ओढत असतात. जो अतिकर्मी मनुष्य असतो त्याला वेळच

नसतो की माझी उत्क्रांती झाली पाहिजे, की मी काहीतरी करुन, माण्यातुन विशेष निघाले पाहिजे. त्याचा तिकडे विचारच नसतो. सगळा वेळ तो आपली परमेश्वराने दिलेली जी शक्ती आहे ती ओढत असतो. आणि म्हणूनच आपण पाहिलेले आहे की अशा लोकांना सारखे वरचेवर रोग होतात. आता ही शक्ती विष्णुशक्ती आणि शिवशक्ती आहे तर ही विष्णुशक्तीतुनच ही सहा चक्र वरती निघालेल आहे. आणि ह्या सहा चक्रमधून म्हणजे स्वाधिष्ठान चक्रसुध्दा विष्णु शक्तीतुनच निघालेलं आहे.

जेव्हा ही कुंडलिनी हे सर्व छेदुन वर जाते तेव्हा ती संपूर्ण शुध्द विद्या म्हटली पाहिजे. किंवा जे शुध्दतत्व आहे, परमेश्वराच्या इच्छेने ते त्याच्यातुन छेदून जाताना जागृत करुन जाते. म्हणजे आपल्यामध्ये बसलेले जे काही सुप्त देव आहेत जे अजून प्रज्वलित झालेले ते जागृत होतात. ते जागृत होतात ते जागृत झाल्यावरोबरच ह्याचे आपल्याला सुपरिणाम मिळतात.

लक्ष्मीतत्व जागृत झाल्यावरोबरच आपल्याला माहित आहे की लक्ष्मीचे काय अंग असते ते. लक्ष्मी म्हणजे अति श्रीमंत मनुष्य नाही. पैसेवाला नाही. लक्ष्मी म्हणजे एका हातातुन दान असायला पाहिजे, एका हातातुन आश्रय असायला पाहिजे, दोन हातामध्ये कमळ असायला पाहिजे. जो कुंजष आणि कद्रू मनुष्य आहे तो लक्ष्मीतत्वाला मुळीच अजून प्राप्त झालेला नाही. जो मनुष्य कमळासारखा अंत्यत प्रेमळ आणि ज्याच्या घरी कोणीही जावे. म्हणजे इतका मी भुंगा इतका काटेवाला तो जरी आला तरी कमळ त्याला कसं अगदी संभाळून घेते, असा जो करील तोच मनुष्य आपल्याकडे खरा लक्ष्मीपती मानला जातो. पण आपल्याकडे असे किती लक्ष्मीपती आहेत? नाहीतच म्हटलं तरी चालेल. लक्ष्मीपती ज्याला आपण म्हणतो तो खरा म्हणजे जे खुप पैसेवाले आहेत, गाढवावर पैसे लादावेत अशा त-हेचे लोक आणि अशा लोकांना काहीही धर्म कधी मिळणार नाही. श्री. ख्रिस्तांनी सांगितले आहे की ज्या माणसाजवळ अती पैसा आहे, तो कधीही प्रभूच्या साम्राज्यात येऊ शकत नाही. एक वेळेला एक उंट तुम्ही एका सुईच्या भोकातुन घातला तर तो जाऊ शकेल पण असा मनुष्य जाऊ शकत नाही. त्याला कारण हे तर अशा माणसाला सगळा पैसाच दिसतो. दुसरं काहीच दिसत नाही. आपले आईवडील दिसत नाहीत. भाऊ वहिणी दिसत नाही. बायको दिसत नाही. काही दिसत नाही मी किती मोठा. माझ्याजवळ एवढा पैसा आहे पण एकदा तो पैसा हरवला की मग त्याच्या लक्षात येते की तो कुठे गेला. अति पैशाचे पण आपल्याला माहित आहे की त्यामुळे मनुष्याला थेर सुचतात की तो आत कुठे खर्च करायचा? जर पैसा जेमतेम असला, ज्यांनी आपल्याला समाधान मिळतं ती विष्णुशक्ती जर आपल्यामध्ये जागृत झाली, तरच मनुष्याची पुढे प्रगती होऊ शकते. म्हणजे त्याचे चित्त पैशाहून समाधानावर आल्यावरती मग तो पुढच्या मार्गाला लागतो पण समाधानच जर पैशातून आलं नाही, म्हणजे असं आहे की आम्हाला वाटलं एक घर बांधावं तर घर बांधु. घर बांधल्यावरती मग वाटेल की आत मोटर घ्यावी, मग आम्ही मोटर घेऊ. मोटर घेतल्यावरती आम्हाला वाटेल बिल्डिंग घ्यावी काहीतरी सारखं चालत रहाणार. म्हणजे कधीही आपल्याला समाधान नाही मिळणार. पण हे जडत्व, स्थूल आहे. ही वस्तु आहे. त्या वस्तुपासून मानवाला कधीही समाधान होणार नाही. ही जड वस्तु आहे. जडतेने आपल्याला फक्त जडता येते. जडतेने समाधान येऊ शकत नाही. समजा एखाद्याला खुर्चीची सवय झाली मग जमिनीवर बसू शकत नाही म्हणजे खुर्ची चिकटली त्याला. म्हणजे सर्व जडता आहे ती माणसाला सवय लावते. कोणत्याही गोष्टीची सवय जी जडतेची लागते. तर त्या सवयीमध्ये माणूस हळूहळू विरघळून त्याच जे काही सत्व आहे ते नष्ट होते.

कोणत्याही जड वस्तुनी माणसाला समाधान येऊ शकत नाही. फक्त परमेश्वरी तत्वानेच येऊ शकते. जो पर्यंत तुमचा आत्मा तुमच्यातुन प्लावीत होत नाही, प्रस्फुटीत होत नाही, स्तंभीत होत नाही तो पर्यंत तुम्हाला समाधान कधीही मिळणार नाही. तुम्ही वाटेल तितके पैसे कमावून बघा, वाटेल, त्या सत्तेवर तुम्ही जाऊन बघा, पण तरी तुमचा चेहरा नेहमी सुतकीच राहील. पण असा एखादा बादशहा मनुष्य की जो काहीही नसताना मजेत असतो. कुठे झोपवलं तरी मजेत असतो. अशा माणसाला पाहिल्यावर आपल्याला लक्षात येईल की ही जी शक्ती आहे, ती आपल्यामध्ये तृप्त झाली आहे. आता काही तरी पुढचं पाहिले पाहिजे. आता काहीतरी दुसरं असायला पाहिजेउ हे जे झाले हे समाधान झालं फार झाले, आता आणखी नको हे. हे प्रपंच फार झालेत, ह्याच्यापुढची पायरी काय? तर तेव्हा मनुष्य धार्मिकतेला जागृत होतो मग त्याच्यातही मनुष्याचे डोके बाहेर येते. पाहिले एक ब्राम्हण बोलवायचा, मी तुला दोन पैसे देतो, तु पूजा कर. प्राप्ती लावायची किंवा फार तर एखाद्या देवळाला शे-पाचशे रुपयांची देणगी दिली. वा वा आम्ही देणगी दिली. नाहीतर एक देऊळ बांधून टाकायला हरकत नाही. ह्या देवळाचं काय होणार आहे? तुमच्या देवळाची काय स्थिती आहे? इकडे आहेत की नाही देव स्वतःमधे? इथले देव तुम्ही जागृत केलेत की नाहीत?

तुमच्यामध्येच बसलेला आत्मा आहे. तुमच्यामध्येच बसलेला परमात्मा आहे. मग तुम्ही त्याला का नाही जागृत करत? कारण असं आहे की, माणसाला स्वतःला बघायचं म्हणजे मोठा त्रास. तो स्वतःला बघू शकत नाही. आणि त्याच्यासाठी कुंडलिनीची व्यवस्था आहे. ही कुंडलिनी एकदम उठते आणि वर येते ते कां? सगळेच्या सगळे देव जागृत होतात. आता पुष्कळांना असं वाटते की, कुंडलिनी जागरण म्हणजे मोठं कठीण काम आहे. पण तसं नाही. आपण आता पाहिलतच, किती सोपं आहे. काल किती लोकांना पार केलं? काल किती लोकांच्या हाताला थंड लहरी 'सौंदर्य लहरी' आल्यात. हे अत्यंत सोपं काम आहे. पण हे ज्याला जमतं तोच करु शकतो. ज्याला हे जमत नाही त्यांनी त्याच्यात पडू नये. अधिकार चेष्टा करू नये. ज्याला ह्याचा अधिकार आहे. त्याच्यासाठी ही संबंध लिला

आहे. आणि जेवढं काही महत्वपूर्ण आहे, तेवढं सोपं असायला पाहिजे. तर आता ही जी शिवशक्ती तुमच्यामधे डावीकडे आहे, ही शिवशक्ती सदाशिवाच्या आणि आपल्या इथे सुध्दा विराजित आहे असं म्हटलं पाहिजे. कारण त्यांच्यामध्ये आत्मा आणि शिवशक्ती दोन्ही आहेत. त्या स्थितीमध्ये, तिथे जेव्हां जाऊन ही कुंडलिनी ब्रम्हरंध्राला छेदते, तेव्हां तो प्रकाश सगळीकडे पडतो. आणि तुम्ही एका नवीनच अवस्थेमध्ये उतरता. एका नवीन आयामात उतरता. तुमच्या चेतनेला एक नवीन रुप मिळते. म्हणजे तुमच्या चेतनेमध्ये एक प्रज्वलीतपणा येतो. 'प्र' शब्द जो आहे तो ह्याच्यात बरोबर वापरण्यासारखा आहे. 'प्र' म्हणजे प्रकाशित झालेला. आत एक दीप आहे. तो जळालेला नाही त्याला काहीच अर्थ नाही. तो पेटवल्याबरोबरच तो प्रज्वलीत झाला तसेच तुमचे चित्त आहे ते प्रज्वलित होते. प्रज्वलित होते, त्यामुळे प्रकाश पडतो, प्रकाशामुळेच तुम्हाला सगळं दिसायला लागते. आता तुम्हाला काही दिसत नाही, अलक्ष आहे, अपरोक्ष आहे, वगैरे - वगैरे लोक बोलतात आणि त्यामुळे तुम्हाला समजत नाही. ह्याला इलाज काय ? इलाज आहे. तुमच्यामधे प्रकाश आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार झाला पाहिजे. आत्मसाक्षात्काराशिवाय तुमची अविधा जाणार नाही आणि ते हे घटीत झालेच पाहिजे. ते परमेश्वराचे कार्य आहे. त्यांना हे कार्य करायलाच पाहिजे. त्यांनी हे संसाराचे सुंदर स्वप्न रचलेलं आहे. आणि त्यांची ही रचना जर फलद्रुप झाली नाही तर परमेश्वरालाच अर्थ रहाणार नाही. तेव्हा त्यांना हे कार्य करावे लागेल. आणि ते कसं करायचं ते त्यांना माहीत आहे.

पुष्कळसे लोक म्हणतात - "आम्ही माताजी शिवजीचे भक्त". त्यामुळे हृदयाचा त्रासत्यांना. अगदी खरी गोष्ट आहे की, शिवाचे भक्त म्हणजे नक्कीच हृदयविकार ! अन अधिकार चेष्टा केल्यामुळे जर शिवशक्ती रागावली तर शिवशक्ती जी आहे, ती तुमच्या अस्तित्वाला कारणीभूत आहे, तुमचं अस्तित्वच नष्ट होणार. म्हणून तुमच्या हृदयाचा त्रास पण त्याला पर्याय आहे. तर काय करायचं ? क्षमा मागायची. शिवाकडे आपण क्षमा मागितली पाहिजे, फार सोपी गोष्ट आहे. शिवाला सांगायचं आमचं चुकले, तू करुणासागर आहेस, दयासागर आहेस. तु आम्हाला क्षमा क. आता आम्ही नीटपणानी चालणार आहोत.

इथून तिथून या महाराष्ट्रात इतके गुरु आहेत. त्यातले फार तर दोन चार खरे गुरु झालेले आहेत. बाकी सगळे अगदी भामटे आहेत. आणि त्यांचे मारे फोटो घरात ठेवलेले आहेत. आणि सांगून ठेवते आता कलीयुग संपलेला आहे आणि सत्ययुगाला सुरुवात झालेली आहे. त्या गुरुंच्यामुळे तुम्हाला लुकेमीयाचा, कॅन्सरचा रोग होणार आहे आणि सहजयोगाशिवाय हा ठीक होणार नाही आणि त्यामुळे आता लक्षात ठेवा. जर तुम्ही अशा गुरुंची आणि घाणेरड्या लोकांची सेवा केली, तर त्याचे परिणाम तुम्हाला भोगावे लागतील. हे एक आईच्या प्रेमाने अत्यंत करुणेने सांगत आहे.

सहजयोगानी तुमच्यात प्रकाश येईलच आणि त्या प्रकाशाने तुम्ही जाणणार की, बाहेर किती खोटे काम चाललेले आहे. आणि हा खोटेपणा किती बळावलेला आहे. या धर्मान्धतेनी आणि अशा रितीच्या देवळात जाऊन, इकडे जाऊन, तिकडे जाऊन काय आपलं आयुष्य अगदी बरबाद करुन राहिलेत. त्याला काहीतरी मार्ग द्या. त्याला काहीतरी प्रकाश द्या. हे मानवाचे शरीर तुम्हाला माहित नाही, परमेश्वराने किती मेहनतीने बनवले आहे. कितीतरी योनीतून तुम्हाला काढून या स्थितीत आणलेलं आहे. तेव्हा ही स्वतंत्रता आपण वापरली पाहिजे. आपण कोण आहोत ? परमेश्वराने आपल्याला कोणत्या स्थितीतुन इथे आणलंय ? किती प्रेमाने, किती संगोपन करुन आज आपण आपली त्यांनी इतकी सुंदर स्थिती केलेली आहे. ह्या इतक्या सुंदर झालेल्या आपल्या मानव देहाला, आपल्या मनाला आणि ह्या संबंध मानव व्यक्तित्वाला कोण-कोणत्या स्थितीला आणलंय. कुठे बसवलेले आहे ह्याचा विचार करावा. स्वतःची मान्यता झाली पाहिजे. एक बाणा असायला पाहिजे. माणसामध्ये समजण्याचा की, आम्ही कोण ? कुठे जाणार ? आम्म्हाला काय हवंय ? तेव्हा तुम्ही आपले या आणि स्वतःचं कल्याण करुन घ्या. त्या गुरुंच्या मागे उगीचच तुम्ही स्वतःला त्रास करुन घेऊ नका. आणि 'स्व' ला प्राप्त झाल्यानंतर ह्या गुरुपासुन कशी सुटका करायची हे शिकून घ्या. पण त्यांच्याशी वादायला जाऊ नका. भांडायला जाऊ नका. ते तुमच्या हद्दीत बसत नाही. ते तुम्हाला जमायचं नाही. ही गोष्ट अगदी खरी आहे आणि तिथे जरी तुम्ही किती बलवत्तर असाल. पण तरीसुध्दा हे लोक अत्यंत दुष्ट असतात आणि त्यांच्यात इतक्या घाणेरड्या विद्या असतात आणि इतके पतित असतात ! तेव्हां मला वारंवार सांगायचंय की, अशा लोकांच्या मागे तुम्ही जरी गेले असाल तरी सहजतेतच तुम्ही त्यांना सोडलं पाहिजे. जर तुम्ही ते सहजतेत सोडून दिलं तर त्यांनी फारच लाभ होण्यासारखं आहे. कधी कधी या गुरुंचे प्रकार बघून मला इतका त्रागा वाटतो, इतका क्रोध येतो की, कधी कधी वाटतं जर संहारशक्ती वापरली तर याचा सहज संहार परमेश्वर करु शकतो पण संहार करुन तरी काय करणार ? कारण कलीयुगामध्ये अशी स्थिती आहेच आहे की 'यदायदाही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत' झालेला आहे. परंतु ह्या जगामध्ये असे साधु कोण आहेत ? 'परित्राणाय साधूना विनाशायत दुष्कृताम्' दुष्कृतांच मुख्य आहे साधुमध्ये तेव्हा ह्यांच्या डोक्यात घुसलेले दुष्कृत्य आधी काढायला हवे, तेव्हाच त्यांना पार करता येईल. अत्यंत नाजुक स्थिती आहे. मला दिसतय की तुमच्या ब्रेनमध्येच ते घुसलेले आहे. तेव्हा काढायला पाहिजे, ते स्वच्छ करायला पाहिजे ते व्यवस्थित काढून तुम्हाला तुमच्या ठिकाणी द्यायचंय आणि तुमची जी संपदा आहे ती तुमच्यात बसवायची आहे.

# कुंडलिनी आणि ब्रम्हशक्ती

(दिनांक २३ सप्टेंबर १९७९ रोजी श्री माताजींनी दादर येथील अमर हिंद मंडळात दिलेल्या भाषणाच्या आधारे)

आजचा विषय आहे कुंडलिनी आणि विष्णूशक्ती तसे ब्रम्हशक्ती तैसे पाह्यला गेलं तर हा फार प्रचंड विषय आहे. थोड्या वेळात त्यात फारच अगदी ज्याला Elementary म्हणतात, बरचरचे असे सांगता येईल.

तरी सुद्धा जरा लक्षपूर्वक हा विषय ऐकला तर आपणाला लक्षात येईल. भाषण देताना सुद्धा माझे लक्ष आपल्या कुंडलिनीवरच असते. तेव्हा आपले हात माझ्याकडे काहीतरी मागत अश्या रीतीने सगळ्यांनी ठेवावे त्यामुळे सगळ्या भाषणाला व ध्यानाला अर्थ प्राप्त होतो, तेव्हा तुम्ही पार होता, नाहीतर त्याला काही अर्थ राहात नाही. हात असे ठेवावयाचे. पायात जोडे असले तर काढून ठेवावे. गळ्यामध्ये काळे गंडे (दोरे) असतील तर ते काढून टाकावे हे बरे. कमरेला जर काळा करगोटा असला तर तोही काढलेला बरा.

आता काल मी आपल्याला थोडेसे सांगितले की परमेश्वराची इच्छा, किंवा त्याची इच्छाशक्ती ही आपल्या डावीकडील ईडा नाडीतून वाहात असते. त्या इच्छाशक्तीचा थोडासा भाग कुंडलीनी ही आहे. म्हणजे परमेश्वराने आपली स्वत:ची इच्छाच आपल्यामध्ये ह्या त्रिकोणाकार अस्थीमध्ये ठेवली आहे. मनुष्याचा पींड तयार झाल्यावर जी वाचलेली शक्ती असते ती ही शक्ती आहे. म्हणून इंग्लीशमध्ये तिला रेसीड्युअल ऐनर्जी (Residual Energy) असे म्हणतात. पण ही शुद्धशक्ती आहे तसेच ही शुद्ध इच्छा शक्ति सुद्धा आहे. ही इच्छा संपूर्ण परमेश्वराची इच्छा असल्यामुळे तिच्यात आपल्या इच्छेचा समागम न झाल्यामुळे किंवा त्याच्यावर आपल्या इच्छेचा कोणताही परीणाम न झाल्यामुळे ती अत्यंत शुद्ध आहे आणि त्या शुद्धांत ती तिथे बसलेली आहे. ती त्रिकोणाकार अस्थीमधील शक्ती जी बाहेरून त्रिकोणाकार दिसते. परंतु आतुन ती साडेतीन वेटोळे घालून का आहे. त्याचे मोठे गणित आहे. पण मी म्हटले की, सगळ्या गोष्टींचा मी नुसता उल्लेख करणार आहे. आपण याच्यावर लिहिलेली जी पुस्तके आहेत, ती वाचावी. आमच्याकडे दि अॅडवेन्ट (The Advent) एक फार छान पुस्तक इंग्लीशमध्ये आहे, ते पण वाचून काढले तर फार फायदा होईल. नंतर ही शक्ती जसे एखाद्या बीजामध्ये ती अपार शक्तिप्रमाणे आहे.

आता ही जी इच्छाशक्ति आहे, ती जेव्हा आपण वापरू लागला तेव्हा, ती आपल्या ईडा नाडीतुन वाहते त्यामुळे इच्छेला पूर्ण करण्यासाठी काहीतरी क्रिया करावी लागते नुसती इच्छा केली तर त्याचे दृश्य आपल्याला दिसू शकणार नाही. ह्या इच्छेला क्रियेमध्ये घालावे लागते आणि त्याच इच्छेतून क्रियाशक्ति निघालेली आहे. आणि तीच क्रियाशक्ति आपल्या उजव्या बाजूने आलेली आहे. ती आपल्या शरीरामध्ये पिंगला नाडीतुन वाहात असते. या दोन नाड्याखाली जिथे मिळतात तिथेच श्रीगणेशाचे स्थान आहे. इच्छाशक्ती ही भावनामय आहे. भावनात्मक आहे. माणसाच्या भावना दिसत नाहीत दृश्य होत नाहीत. त्या भावनेला जेव्हा साकार रूप येते तेव्हाच त्याचा अविष्कार होतो. ते साकार रूप सुद्धा या शक्तिमुळेच होते. तेव्हाच ही दुसरी क्रियाशक्ती डावीकडून उजवीकडे येते. ह्या क्रियाशक्तीला आम्ही सहजयोगामध्ये महासरस्वतीची शक्ती म्हणतो. पहिली महाकालीची व दुसरी महासरस्वतीची शक्ती. महासरस्वतीची शक्ति ही आपल्या (उजव्या) पिंगला नाडीतून वाहात असते. हीच ब्रम्हशक्ती आहे. ही ब्रम्हशक्ती जेव्हा कार्यान्वित होते. अर्थात क्रियाशक्ति जेव्हा कार्यान्वित होते, तिलाच आपण ब्रम्हशक्ती म्हणतो. आणि त्याची देवता आहे ब्रम्हदेव. म्हणजे महासरस्वती या ब्रम्हक्रियेला मदत करतात. ब्रम्हाच्या क्रियाशक्तीला मदत करतात, किंवा ती शक्ती त्यांच्यातून वाहते. तेव्हा ब्रम्ह कार्यान्वित होते. आता जे काही आपण वेदान्त वगैरे वाचलेले आहे. हे फक्त ब्रम्हशक्तीवर लिहिलेले आहे. आश्चर्याची गोष्ट आहे की, ज्यावेळी मानव संसारात आला तेव्हा त्यालासुद्धा क्रिया करण्याची इच्छा झाली. इच्छाशक्ती तर त्याच्यात होती, पण क्रिया करण्याची इच्छा झाली.

क्रिया करण्यासाठी आधी मानवाला पहिला सामना करावा लागला तो पंचमहाभूतांशी ही पाच पंचमहाभूते आपल्यामध्ये आली कुठून? तर त्यांच्या पाच तन्मात्रा असतात. त्यांच्या आधी महद् अहंकारादी अशी एकदंर चोवीस गुण आहेत. ह्या सर्व शक्तीतूनच हे सर्व २४ गुण प्रगट झाले आणि त्यांनी संसारामध्ये पंचमहाभूते निर्माण केली ह्या पंचमहाभूतांना हातात कसे धरावयाचे, त्यांच्यावर मास्टरी कशी मिळवायची त्यांना

उपयोगात कसे आणावयाचे त्यांना जाणून कसे घ्यायचे ? तेव्हा एका गोष्टीचा अंदाज लागला की ह्या पंचमहाभूताचे काही तरी एकेक दैवत, एकेक अशी काही शक्ती आहे; ती त्यांना नियमीत (कंट्रोल) करते. प्रत्येक पंचमहाभूताला एक शक्ती आहे. ती त्यांना साभांळून आहे आणि तीच त्यात अबाधित रहाते. तेव्हा त्यांनी अग्नी, वायू वगैरे प्रत्येक देवतांची पुजा सुरवातीला केली.

नंतर त्यांनी यज्ञ-हवन करून, या पंचमहाभूतांना जागृत केले. त्यांना जागृत करताना त्यांना आढळून आले की, त्याच्या मध्ये सात शक्त्या आहेत, त्या सात शक्त्यांपैकी एक शक्ती ही गायत्री आहे, दुसरी सावित्री आहे. अशा सात शक्त्या आहेत. तेव्हा गायत्रीमंत्र हा त्या वेदातून निघाला. आणि गायत्री मंत्र हा सुद्धा त्या पिंगला नाडीवरती बसलेल्या सर्व देवतांना, तसेच पंचमहाभूतांवर जागृत असलेल्या सर्व देवतांना, त्याशिवाय-विराटाच्या उजव्या बाजूला असलेल्या सर्व देवतांना जागृत करण्यासाठी आहे.

एक महान शक्ती माणसाने निर्माण केली, आणि जेव्हा त्यांनी या पंचमहाभूतांना आहुत्या देऊन त्यांच्यातल्या देवतांना आवाहन केले. तेव्हा त्या देवता जागृत झाल्या, त्या देवतांच्या जागृतीमुळे ही पुष्कळ हजारो वर्षांपूर्वीची गोष्ट आहे;- जेव्हा त्या सर्व शक्त्या जागृत झाल्या, तेव्हा त्यापासून त्यांनी गुण जागृत करून सर्व सुखसोयी निर्माण करून, मानव उच्च स्थितीला पोहचला. रामाच्या वेळेला सुद्धा विमाने होती. विमानातून लोक जात असत. त्यांनी लंकेतून आयोध्येस प्रवास केला आहे. आणि अर्जुनाच्या वेळेला आपल्याकडे चक्रव्यह होते अशी विशेष साधने होती. किंवा अशा तऱ्हेची उपकरणे होती की ज्यांनी आपण मोठमोठ्या लढाया जिंकू शकत होतो. आयुध वगैरे सगळे काही आपल्याकडं होते. आणि हल्ली अॅटम बॉम्ब आहेत! तशा तऱ्हेची अस्त्रेसुद्धा होती. तसेच अंतरिक्षामध्ये जाण्याच्या सर्व व्यवस्था होत्या. ही गोष्ट अगदी खरी आहे.

त्यावेळी भारताची स्थिती फारच उच्च होती. भारतीय वास्तुशास्त्र आपण म्हणतो त्या वेळेला आपण उच्चतम स्थितीला होते. लोकांच्याजवळ अनेक तऱ्हेची वाहने असायची. प्रासाद वगैरे सर्व खुप सुंदर बांधलेले असायचे. हे सर्व पिंगला नाडीच्या कृपेने मिळालेले होते. इंग्लीशमध्ये याला आपण सुप्रा कॉन्शस अॅरियल (Supra Conscious Arial) असे म्हणतो म्हणजे या प्रातांत जर मनुष्य आला आणि उर्ध्वदेशेला पोहोचला, तर भूगर्भामध्ये काय आहे? आकाशात काय आहे? हे विवरण करू शकतो. पण या पिंगला नाडीला प्रार्थना करतांना, अनेक गोष्टींचा विचार केला जाईल. प्रथम म्हणजे पुर्वीची आपली वर्णावस्था होती. ती वर्णावस्था एक विशिष्ट पद्धतीने झाली होती. म्हणजे मुलगा २५ वर्षांचा झाला. २०-२५ म्हटलं तरी चालेल की. मुलगा किंवा मुलगी एकाच युनिव्हसिटीत जात असत आणि त्याला आपण गोत्र म्हणतो. ह्या युनिव्हसिटीतली मुलं किंवा मुली विवाह करू शकत नसत. इतकंच नव्हे, तर वर्षानुवर्षे किंवा पिढ्नपिढ्या सुद्धा, जर त्यांची अशी इच्छा झाली की, इथे लग्न करायचे तर रूढीविरुद्ध असे अजुनसुद्धा आपल्याकडे सगोत्र विवाह करत नाहीत. म्हणजे तेव्हाची जी प्रथा होती, की एका युनिव्हसिटीत वाढलेली मुले-मुली लग्न करू शकत नसत. २५ वर्षे; ब्रह्मचर्यामध्ये रहावे लागत होते. त्यांचे आत्मसाक्षात्कारी गुरु होते. ते मुलांना त्या ब्रह्मचर्यामध्ये हठयोग शिकवत आत.

आजकालच्या हठयोग म्हणजे सिनेमा अॅक्टर, अॅक्ट्रेस बनविण्याचा आहे. कालच मला प्रशन्न विचारला होता की, माताजी हठयोग आणि कुंडलीनीचा काय संबंध आहे? आता आधुनिक सगळच घाणेरडे झाल्यामुळे पूर्वीचे जे पातंजली शास्त्र आहे, त्याच्यात अष्टांगयोग जो सांगितलेला आहे की, त्यामुळे सारी आठच्या आठही अंगावरती जोर आहे. त्यामुळे नुसती आसने करणे हे काही लोकांच्या डोक्यातसुद्धा येणार नव्हतं कारण आसन वगैरे, प्रकार २५ वर्षांपर्यंत जेव्हा मुलगा किंवा मुलगी अजुन लग्न झालेली नाहीत, भाऊबहिण बनून एकत्रित राहून तेव्हा एखाद्या आत्मसाक्षात्कारी पुरुषाकडे राहून त्या आसनांची दीक्षा घेत असत. आज कालचे मुलांना शिकवलेली आसने सुद्धा खोटी आहेत. आता सगळ्या आसनामध्ये मी बघते की कुंडलिनीला विघ्न करून घटना घडतात. आसनांपैकी जी खरी आसने आहेत, त्यांपैकी फारच थोडी आत्मिक उन्नतीला पोषक आहेत. पूर्वीच्या काही खऱ्या गुरुंच्याकडेसुद्धा जी मुले जात असतं. तीसुद्धा अत्यंत मोजकी असायची, त्यांना लहान वयापासुन २५ वर्षे होईपर्यन्त खुपच खडतर मेहनतीने योगाभ्यास शिकावा लागे. या स्थितीमध्ये साधक मुलांची धार्मिकता अत्यंत उत्तम तऱ्हेने बांधली जात असे. अशा मुलांपैकी परत निवडक मुलांना गुरु आत्मज्ञान देत. परंतु सध्या असे ज्ञान एक दोन जण घेण्याकरिता गेलेत तर; हिमालयातले खरे गुरु त्यांची हकालपट्टी करतील, यात काय नवल? याशिवाय असे हठयोगाचे ज्ञान समाजात पसरवणारे जे गुरु आहेत त्यांच्याजवळ जर धर्माचा बांधाच नाही तर मग आत्मज्ञान कुठून येणार?

काही लोक म्हणतात की, पुष्कळदा आम्हाला अश्या आसनांनी बरे वाटते. म्हणजे शारीरिक दृष्ट्या तुम्हाला बरे वाटते. म्हणजे ही पिंगला नाडी जर तुम्ही जास्त वापरली, तर तुम्हाला शारीरिक अवश्य बरे वाटेल. कारण, शारीरिक आणि मानसिक या दोन्ही गोष्टींसाठी या नाडीतून शक्ती वहात असते.

पण शरीराला जरी बरे वाटले, तरी तुमच्या भावनांचे काय? ह्या मार्गाने जाणारे लोक, अत्यंत रुक्ष होत जातात, कारण ही सूर्यनाडी आहे. काही वेळेला असे लोक इतके रुक्ष होतात की, अशा माणसाचे जीवन नेहमी खराब ! त्यांचे बायकोशी पटणार नाही. आणि त्यामुळे वातावरण घरात खराब होणार. त्याशिवाय त्याना एक तऱ्हेने वैराग्य येणार. त्याशिवाय असे लोक कधी कधी इतके तापट होऊन जातात. जसे आपल्याकडे काही पूर्वीने लोक छळत व श्राही करुन सोडत. आपल्याला माहिती सुद्धा नव्हती. उदा. विश्वमित्र ऋषी हे काही कल्याणाचे मार्ग आहेत का? ऋषी विश्वामित्र फार पोहोचलेले तपस्वी होते की, कुणला पाहिले की भस्म करुन टाकत.

पण हे काही कल्याणाचे मार्ग नाहीत. हा मार्ग आपला नाही. सहजयोगामध्ये आपल्याला हा मार्ग अवलंबून घ्यायचा नाही. या मार्गानी म्हणे काही लोक महर्षी झाले! झाले असतील !! पण त्यांचा उपयोग माणसाला काय होणार? किंवा त्यांनी इतके करुन तरी काय मिळवलय? कधी कधी मला प्रश्न पडतो की अशा रीतीचे जे अर्धवट लोक असतात ते नुसते संन्याशीपणाचे ढोंग करुन फिरत असतात, म्हणून संन्याशाला सहजयोगात स्थान नाही संन्याशी वृत्ती ही पिंगला नाडीच्या पूर्ण जागृतीने होते, पण ती नाडी सहजयोगात आत्मज्ञान आल्यानंतर जागृत झाली पाहिजे. त्याच्या आधी झालेली जागृत्ती काही बरोबर नाही. अर्धवट म्हणजेच एकमार्गी किंवा चुकीची असते. म्हणूनच तुम्हाला मी स्पष्ट करते की संन्याशी लोक भगवे कपडे घालण्याकरता संन्याशी असतात. म्हणजे असे त्यांचे कितीही वय झाले तरी नकोतो त्याचा नाद सुटत नाहीत आणि त्या नादानच गुंतलेले असतात. त्यासाठी त्यांना उभा जन्म फुकट घालवावा लागतो.

पण एकदा तुम्ही सहजयोगात आल्यावर इतके व्यवस्थित, सर्व काही धर्माची बांधणी बसून जाते की, तुम्हाला एवढा आटोकाट प्रयत्न करावा लागत नाही. आणि माणसामध्ये आपोआप शुद्धता जागृत होते. त्याला बायकांच्या बद्दल किंवा दुसऱ्या स्त्रीबद्दल काहीही आकर्षक रहात नाही. कारण तो समाधानी होऊन जातो.

जेव्हा वेद व श्रुती वगैरे लिहिल्या. पंचमहाभूतांना जागृत केले, त्यांच्याच मूर्ती स्वरूप आज आपल्यामध्ये सायन्स आले. सायन्स तरी कुठुन आले? ही जी मंडळी वेदोक्त वगैरे बोलत असत, त्यांनी पाश्चिमात्य देशामध्ये जन्म घेतला आणि त्यांचे परमेश्वराचे शोध अर्धवट राहिले होते, त्यांनी ह्या पंचमहाभूतांना सायन्सनी जिंकण्याचा प्रयत्न केला. आणि सायन्समुळे त्यांना असे वाटते. की सायन्सने आम्ही जिंकू आणि त्यामुळे ते आता चंद्रावर शुक्रावर इत्यादी ठिकाणी कुठे कुठे जातात पण ही उजवी बाजू म्हणजे फारच जास्त लहरी आहे. माणसाला त्याच्यामध्ये फारच जास्त महत्त्व वाढते. म्हणजे असे की तुम्ही आकाशात उडू शकता असे कोणी सांगितले की लगेच एक हजार पौंड सुद्धा घायला तयार असतात. ही मूर्खपणाची गोष्ट आहे आता आकाशात उडण्याची काय गरज आहे? आही आता पक्षी होवुन काय मिळणार? पक्षांच्या वर जाणार का आता पक्षी व्हायला आपल्याजवळ ऐरोप्लेन्स आहेत. सगळं आहे. आता पक्षी होण्याची काय आपली स्थिती आलेली आहे का? आणि उडून तरी काय मिळणार? अमेरिकेहून आपल्याकडे काही वर्षापूर्वी योगाने उडण्याचे शास्त्र शिकण्यासाठी फार मोठे शास्त्रज्ञ आले होते. आणि मला फार आश्चर्य वाटले. मी त्यांना म्हटले जी उडण्याची गोष्ट आहे. ती होऊ शकते पण त्याच्यात भुतबाधा होते, उडल्यासारखं वाटते, त्याचा भास होतो त्याला वाटते की बाकीचे लोक वेगळे आहेत व मी वरुन वेगळा आहे. वरुन मला सगळं काही दिसते ही सगळी भुतबाधा आहे. ह्या उजव्या बाजूला सुद्धा काही असे पुष्कळसे लोक असतात जे अत्यंत महत्त्वाकांक्षी असतात असे महत्त्वाकांक्षी असतात असे महत्वाकांक्षी लोक मेले म्हणजे त्यांचा आत्मा अतृप्त असतो. त्यांना असे वाटते की, कसे तरी करून परत संसारात यावे ते मरायला तयार नसतात. म्हणून मग ते कोणीतरी माणसामध्ये घुसून प्रयोग करत असतात. त्यांच्यातला एक गुण म्हणजे लोकांना बरे करणे. ठीक करणे.

ब्रह्मशक्ती म्हणजे पाच तन्मात्रा आणि त्यातून निघालेल्या ह्या पाच पंचमहाभूतांना जागृत करण्याची शक्ती आहे. ती पिंगला नाडीवर आहे. मग मनुष्य जेव्हा कोणतीही क्रिया करतो किंवा पुढचा कोणताही विचार करतो, किंवा भविष्याचा विचार करतो किंवा जेव्हा तो आपल्या शारिरीक कार्यासाठी उद्युक्त होतो, शरीर चांगल राहिले पाहिजे, शरीराचा बांधा ठीक झाला पाहिजे. माझी प्रकृती ठीक झाली पाहिजे वगैरे असेही विचार करतो, तेव्हा ही पिंगला नाडीतील वाहू लागते त्याशिवाय जेव्हा आपल्या शारीरिक स्थितीचा उपयोग करतो, तेव्हा सुद्धा ही शक्ती फार वाहू लागते म्हणजे एकच शक्ती जर फार वाहू लागली, तर दुसरी शक्ती थिजून जाते आणि एक शक्ती जास्त वाहिल्यामुळे कधी कधी आशा मनुष्यामध्ये विकृती निर्माण होते.

जेव्हा आपण उजवी बाजू जास्त वापरतो तेव्हा डावी बाजू कामातून जाते. आणि त्यामुळे डावीकडचे सर्व रोग होतात आता उजवी बाजू जास्त वापरली, तर कसले रोग होऊ शकतात ते आपण पाहू या.

आता पहिल्यांदा म्हणजे असे की, ही शक्ती फार वापरल्यामुळे आपल्याला जे मुख्य कार्य करायचे ते आपण करू शक त नाही. स्वाधिष्ठान चक्रातही ह्या नाडीला महत्त्वाचे स्थान आहे. कारण ब्रह्मदेव हे स्वाधिष्ठान चक्रावर बसलेले आहेत आणि तेच ह्याला शक्ती देत असतात तर असे असण्याचे पाहिले कार्य हे आहे का सृजनशक्ती साठी लागणारी कोणती शक्ती आहे, तीची आर्टीस्ट असलात समजा, आणि जर तुम्ही सहजयोगी नसला अन् पुर्ती करावयी जर तुम्ही मोठाले / आर्टीस्टच असला तर तुम्हाला काय रोग होण्यासारखे आहेत? पैकी पहिला रोग तुम्हाला असा होईल की, तुम्ही फार कठोर स्वभावाचे होऊ शकता. तुमच्यामध्ये काहीही प्रेमळपणा राहाणार नाही. तुमच्याजवळ कोणी मनुष्य उभा राहू शकणार नाही. कोणी म्हणतात तो मोठा आर्टीस्ट असणार; की मग तो दाढी वाढवतो. काहीतरी आपण संन्याशी वगैरे आहे; हे दाखवायला, असला प्रकार करायला लागतो आर्टीस्ट म्हणजे हजार माणसात तुम्ही ओळखायचे की, काही तुम्ही आर्टीस्ट का? असे म्हटल्याबरोबर त्यांनी एक कॉलरवरती करावी. असा मनुष्य अत्यंत क्रोधी असतो. त्याला कारण की, उजवीकडली बाजू वापरल्या कारणाने संतुलन येत नाही. त्याच्या भावना कमी होतात.

जर एखादा माणूस पुष्कळ धावत असला, हिंदुस्थानात तसे बघायला मिळत नाही. पण बाकी सर्व देशामध्ये अशा प्रकारांची फार चढाओढ चालली आहे. तिथे सगळे लोक धावत असतात. एके दिवशी सकाळी असा एक मनुष्य आमच्याकडे आला आणि मला म्हणायला लागला की, मी सारखा धावत असतो; पण मला काही सुख होत नाही. दुःख होत नाही. मी सुखदुःखाच्या पलीकडे गेलोय. मी म्हटले असे नसते ते आनंद ही दुसरी गोष्ट आहे आणि सुखदुःखाच्या पलीकडे जाऊन पचवणे; दगडासारखं होणं म्हणजे काही माणुसकीला धरून नाही. हा माणूस माणुसकीला विसरूनच जातो म्हणजे आता तिसरे लोक अत्यंत सडेतोड बोलतात किंवा स्पष्ट वक्ते म्हणतात कुणाचे काहीही दुखले किंवा कुणाला काही त्रास होईल किंव कोणाला आपण बोलतो तर त्यामुळे त्याला काहीतरी दुःख होईल वगरे कल्पना अशा त्या माणसाला येत नाहीत. कारण तो कधी कधी फार यशस्वी सुद्धा होतो कारण ज्याला आपण यश म्हणतो ते पाच तत्वांना जिंकल्यानंतर येऊ शकते म्हणजे एखादा मनुष्य फार मोठा ऑफिसर असला किंवा काहीतरी त्यांनी मोठी सत्ता मिळविली असली, म्हणजे हमखास पिंगला नाडीचा रोग होतो. म्हणजे 'ग' ची बाधा होते त्याला 'ग' ची बाधा झाली म्हणजे अशा माणसाजवळ एक ढाल घेऊन गेले पाहिजे. सरळ तुम्ही भेटायला गेलात तर कधी तुमचे डोके फुटेल याचा काही नेम नाही एकदा एका मनुष्याकडे एक गृहस्थ भेटायला आले आणखी तिथे एक दुसरे गृहस्थ होते ते सर्वांवर ओरडत होते. भेटायला गेलेले बिचारे आपले गरीब खेडवळ होते त्यांना हा प्रकार काही माहिती नव्हता. त्यांनी ओरडणाऱ्या गृहस्थाला विचारले की, तुम्हाला काय हवे? तर म्हणं तू कोण मला विचारणार? मै पि. ए. हूँ अरे पहिले बतयाचा होता तुम पीये हुऐ है? त्यांनी परत सांगितलं की मै पी. ए. हूँ. त्यांनी पी. ए. झाले म्हणजे काय फार मोठं कमालव! पिंगला नाडीवर जे फार कार्य करतात ते आम्ही हे कार्य करणार ते कार्य करणार असे बोलत असतात त्यांच्यां मागे एक अत्यंत विक्षिप्त प्राणी जिवंत असतो आणि तो म्हणजे अत्यंत कठोर हृदय ज्याला प्रेमाचा विचार नसतो, ज्याला कुणाचे सुखदुःख समजत नाही.

आता आपल्या महाराष्ट्रात लोकांचे असे म्हणणे आहे की, महाराष्ट्रीयन लोक म्हणजे जरा जास्तच कठीण बोलतात. कठीण बोलण्याची पद्धत आपल्या महाराष्ट्रात फार आहे. गोड बोलणे जरा आपल्याकडे कमी आहे आणि त्यालाही कारण मला असे वाटते की, आपल्या साधुसंतानी शब्दाचे वार केलेत. तेव्हा आपल्यालासुद्धा वाटते की आपणही लोकांना दोनचार चिमटे घेतले तर काय हरकत आहे? पण साधुसंतांचं वेगळे आहे. त्यांचे ते परीक्षा घेण्याचे प्रकार असत. तरी सुद्धा आपण मात्र सगळ्यांशी गोड बोलले पाहिजे. गोड बोलणे म्हणजे त्याच्यामध्ये तुम्ही काही कोणाची हांजी हांजी करत नाही. एकतर तुम्ही कोणाला हाजी करायला जाल, नाहीतर तोडायला बघाल. काही मधोमध आहे की नाही? सहजयोग आमचा हा मधोमध असतो तेव्हा माणसामध्ये एक त्हेचा गोडवा असला पाहिजे. बोलताना त्याच्यामधे भावना असली पाहिजे. दुसऱ्या माणसालाही भावना असतात. त्याला दुखवताना सुद्धा आपण त्याचा विचार केला पाहिजे.

विशेषतः बायकांना खऱ्या जास्त भावना हव्या. त्याच कधी कधी इतका दुष्टावा करतात, की आश्चर्य वाटते. इतका दुष्टपणा बायकांना कुठून येतो? त्याला कारण असे की त्यासुद्धा फार जास्त विक्षिप्त असतात म्हणजे सारखे, आज स्वयंपाक काय करायचा? आज आम्हाला जेवणाला काय करायचे? आता ती मुलगी ऑफिसला तिचे जेवण पाठवायचंय, माझ्या नवऱ्याचे असंं करायचं. अशा तऱ्हेने सगळा भविष्याचा विचार करू लागतात. त्यावेळी ही उजवी बाजू पकडली जाते. ही बाजू धरली गेली म्हणजे असा मनुष्य अत्यंत दुःखी जीव असतो. कारण अशा माणसाला कोणीही जवळ करत नाही. हा सर्वात मोठा रोग आहे. तो कोणाला दिसत नाही. भारतामध्ये पुष्कळ यशस्वी लोक झालेले आहेत. याबद्दल काहीशंका नाही. पण

त्यांच्यामध्ये जो कोरडेपणा आहे त्या कोरडेपणामुळे त्याचे नाव सकाळी घ्यायला कुणी धजत नाही, फार तर संध्याकाळी घेतील आणि तोंड धुवून टाकतील, अशी स्थिती असते.

आता या मार्गावर चालणाऱ्या लोकांची, जे क्षतीवर उरतात म्हणजे अतिक्रियेमध्ये उरतात, ते म्हणजे आम्ही काहीतरी मोठे भारी कार्य करीत आहोत, अशी कल्पना करुन, बाकी सर्व कार्याला मुकतात. म्हणजे तुमची फॅमिली आहे, तुमचं घर आहे, तुमची मुले आहेत. हा एकमार्गीपण झाला. विशेष करुन हे आपल्या देशात फार आहे. बायकांचे तसेच आहे, पुरुषाचे तसेच आहे, त्यांना पूर्णवेळ म्हणजे काहीतरी आम्ही बाहेर करुन दाखविले पाहिजे. जगामधे आम्ही काहीतरी नांव करुन दाखविले पाहिजे. जगामध्ये काहीतरी विशेष दाखवलं पाहिजे असे प्रत्येकाला वाटत असते. मुख्य म्हणजे - पैसे कमविले पाहिजेत आणि ते पैसे कसे जमविले पाहिजेत, हे मुख्य असते. त्याच्यामुळे सगळ्या बायका आणि पुरुष यांच्याच मागे लागलेले आहेत की आम्ही पैसे कसे कमविले पाहिजेत. या पैसे कमाविण्यामुळे कधी कधी नवराबायकोचे पण पटतनाही आणि कुणाचेच कोणाशी पटत नाही.

मी लंडनला गेले तर मला हे वाटलं की सगळे आमच्यावरती कुत्र्यासारखे का भुंकतात बोलतांना म्हणजे, भांडायलाच सुरुवात करायचा. टेलीव्हीजनवर नवरा-बायकांची भांडणे दाखविणार, नाहीतर आई मुलांची भांडण दाखविणार, नाहीतर भाऊ बहिणीचे भांडण दाखवणार, भांडणच दाखवितात दुसरं काहीच नाही. म्हणजे कुठे प्रेमाने कुणी कुणाशी बोलताना कधी दिसतच नाही हसायला लागले की, इतके घाणेरडे हसतील की हेही बघायला नको. शेवटी तुम्हाला टेलीव्हिजन बंद करावा. असे वाटेल. तेव्हा आपापसात प्रेमाने रहावं. तुसडेपणा करणे किंवा कुणाला कमी लेखणं, कुणाशी वाईट रीतीने बोलणे हे सुद्धा माणसाचे दोष आहेत. हे रोग एकदा जडले की समाज एकदम ढासळून पडतो. जेव्हा पिंगला नाडीवर आपण फार प्रवेश करतो आणि पिंगला नाडी जेव्हा फार आपल्यात बलवत्तर होते त्यावेळेला माणसामध्ये एक तऱ्हेचा उद्दमपणाचा वेग येतो आणि त्यामध्ये त्याचे हे लक्षात येत नाही की, आपण दुसऱ्याला काही वाईट बोलतो आहे व आपण बेशरमासारखे वागतो आहो. दुसऱ्याच्या भावना दुखवतो आहो. दुसऱ्याला आपण ठेच मारलेली आहे. यावर आता काय उपाय केले पाहिजेत?

जर मी लोकांना म्हटलं की, तुम्ही नियोजन करु नका. तर त्यांना वाटत फारच जुनाट दिसतात माताजी पण मी म्हणते तुम्ही प्लॅनिंग करु नका आधी परमेश्वराच प्लॅनिंग बघा आणि मगच प्लॅनिंग करा परमेश्वराचे (Planning) हे ओळखलं पाहिजे. आणि परमेश्वराचं प्लॅनिंग आपण जोपर्यंत ओळखू शकत नाही, तोपर्यंत आपल्या प्लॅनिंगला काही अर्थ लागत नाही. प्रत्येक प्लॅनिंगमध्ये अध्यात्म आहे. प्रत्येक प्लनिंग मध्ये परमेश्वराचा हात आहे कारण त्याचे कार्य हे फार मोठे आहे, आणि त्याची शक्तीही फार मोठी आहे. त्याचेजवळ सर्व तऱ्हेच्या शक्त्या आहेत. आता हे जे ब्रह्मतत्व आहे ते आपल्या हातातून येत राहते. तेव्हा त्याचा फायदा आपल्याला सहजयोगात कसा होतो, हे मी सांगणार आहे.

आता आपल्याला आश्चर्य वाटेल की, सहजयोगाने आपल्यामध्ये जेव्हा ब्रह्मतत्व जागृत होते तेव्हा काय होते? तर आपल्या हातून ज्या व्हायब्रेशनस् चालू राहतात, त्या आपल्याशी बोलू लागतात. इथे बसल्या बसल्या आपण सांगू शकत की आपल्या वडिलांची स्थिती काय आहे? आपल्या आईची स्थिती काय आहे. देशाची स्थिती काय आहे आपल्या प्राईममिनीस्टरची स्थिती काय आहे ते कुठे आहेत. त्यांची कुंडलीनी कुठे आहे? ती कुठे बसलेली आहे? त्यांना काय त्रास आहे? त्यांना कोणता रोग होणार आहे आणि कोणता रोग झालेला आहे? हे इथे बसल्या बसल्या आपण सांगू शकता.

जेव्हा ब्रम्हतत्व जागृत होते तेव्हा आपल्या संबंध कार्यक्षेत्रात काही आपण करतो त्याला एक तऱ्हेची इतकी धार लागते म्हणा किंवा त्या कृतीला एक रुपरेषा येते. त्या रुपरेषेचा एक गुणकसंख्या (Coefficient) आहे. त्याचे गुणकसंख्या (Coefficient) काढले तर त्याच्यातून बरोबर व्हायब्रेशन्स येतील. या व्हायब्रेशन्स सुरु झाल्याबरोबर दुसरा मनुष्य जो बसलेला असतो, त्याच्या आत्म्याला आनंद होऊ लागतो आणि त्यालाही ते प्राप्त होते आता आमच्यातले ते एक सहजयोगी होते ते माझ्याकडे आले ते म्हणाले. माताजी मी काय करु? तर मी म्हटलं Interior Decorator व्हा. तर ते म्हणे कपाळ माझं, लाकूड कशाशी खातात ते मला माहित नाही, तर तुम्ही मला Interior Decorator व्हायला सांगता! मी म्हटलं करुन तर बघा नुसत्या व्हायब्रेशनवर आणि आज त्यांनी लाखो रुपये कमविले. म्हणजे असे आहे की नुसत्या व्हायब्रेशनसनी कळते आणि जे व्हायब्रेशनसूनी ठीक आहे ते जागतिक आहे. जी गोष्ट सर्व संसारात मान्य असते तिलाच चांगले व्हायब्रेशनस् येतात. तर सौंदर्यदृष्टी त्यांनी येते. आता इथे बसल्या बसल्या सुद्धा तुम्ही सांगू शकता की कुठल्या ठिकाणी व्हायब्रेशन्स् आहेत. तुमचे गुरु कोण? काही हरकत नाही. आता ते ह्या संसारात नाहीत! तरी तुम्ही सांगू शकता की, ते खरे होते की खोटे ! फार तर काय, इथून तुम्ही लंडनला फोन करु शकता. फार फार पण लंडनला एखादा मित्र असला तर तो मनुष्य

आजारी आहे की नाही, हे तुम्ही इथे बसल्या बसल्या सांगू शकता. त्याला एकही पैसा लागत नाही. त्यावर आता पुढे असं की, तेथे ते आजारी आहेत आणि तुम्ही इथून आता त्यांना बंधन दिल्यावर तिथे ते ठीक होणार. हे तुम्हाला जमू शकणार. आणि त्याचे खूप मजेदार खेळ पण चालत असतात.

अहंकार अशी वस्तु आहे की ती जर तुमच्यात एकदा पसरली तर मात्र तुम्हाला पुष्कळ अंध:करात ओढू शकेल. स्वत:ला साधक ओळखू शकत नाही, इतक्या अंध:कारात मनुष्य ढकलला जातो. आता अहंकार कसा येतो हे मी दाखवते. आता ही इडानाडी ही इथून अशी सुरवात होते, आणि ही पिंगला नाडी या जेव्हा कार्यान्वित होतात, तेव्हा त्यांच्यातून निघालेले धूर म्हणा किंवा एखाद्या फॅक्टरीतून धूर निघतात की नाही, किंवा त्याचे एखादे By Product म्हणा, म्हणून दोन संस्था तयार होतात. एक म्हणजे अहंकार, व दुसरा म्हणजे प्रतिअहंकार म्हणजे आपण जो क्रियाशक्ती वापरतो, त्याच्यामुळे आपल्यात अहंकार निर्माण होतो. तो असा इकडून जाऊन आणि विरुद्ध बाजुला येतो आणि जेव्हा आपण भावनात्मक वागतो तेव्हा प्रतिअहंकार तयार होतो. ती सुद्धा संस्था अशी येथून जाऊन अहंकारासमोर तयार होते या प्रकारे आपल्यामध्ये दोन्ही संस्था अहंकार आणि प्रतिअहंकार येतात. पैकी जे लोक फार भावनात्मक असतात, त्या लोकांमध्ये प्रतिअहंकार असतो. समजा एखादे लहान मूल आईजवळ दूध पीत असलं आणि दूध पिताना त्याला अगदी आनंदात रहायचंय, तेव्हा आई त्याला सांगते की, आता बघ तू रडू नको, मी तुला दुसरीकडी येते. तिने जसे वळवले तसे त्याला अहंकार आला. कशाला माझ्या आनंदात विघ्न घातला? अहंकार आल्याबरोबर, बघ आता रडायचं नाही, चूप रहा, आईनं असे म्हटल्याबरोबर त्याच्यात प्रति-अहंकार आला, म्हणजे तो चूप झाला; पण प्रतिअहंकार आला म्हणजे जेव्हा अहंकार दाबला जातो तेव्हा प्रतिअहंकार येतो. त्यालाच कंडिशनींग आपण जेवढं वाचन करतो, म्हणजे जेवढे आपल्यामध्ये संस्कार होतात, ते प्रतिअहंकारानी होतात. आणि जे अहंकारानी आपण कार्य करतो, ते तर आपल्याला माहितच आहे. पण सुख सुसंस्कार वेगळी गोष्ट आहे. संस्कार नुसते करून घ्यायचे तर पुष्कळसे लोक म्हणतात आम्ही मानतच नाही ही गोष्ट. ही प्रतिअहंकाराची गोष्ट आहे मानत का नाही. तुम्ही काही अनुभव घेतलेला आहे का? तुमच्यात मनाचा खुलेपणा (निरागसता) म्हणतात. ती गोष्ट नाही. दुसरी अहंकारी मनुष्य असतो. तो म्हणतो माझा परमेश्वरावरच विश्वास नाही मी देवालाच मानत नाही. मी कुणालाच मानत नाही. म्हणजे कोणतेच संस्कार नाहीत त्याच्यावर. एकामध्ये अत्यंत अति संस्कार झालेत आणि एकामध्ये कोणतेच नाहीत. त्यांना अहंकार आणि प्रतिअहंकार म्हणतात. आता ही शक्ती आहे, पिंगला नाडीत ती आपल्यामध्ये राइट सिंपथॅटीक नर्व्हस सिस्टिममध्ये येते. जेव्हा आपण ती शक्ती वापरू लागतो, जास्त किंवा अती कमी करू लागतो, त्यावेळेला आपल्यामध्ये कॅन्सर सारखा रोग होऊ शकतो. कॅन्सरसारखा रोग कसा होतो ते आपण पाहिले पाहिजे. एक डावी संस्था आहे. एक उजवी संस्था आहे त्यानंतर हे जे इडा नाडीचे कार्य आहे आणि पिंगलनाडीचे कार्य आहे आणि मधोमध सुषम्ना नाडी आहे तर आपण जर ही उजवी नाडी (पिंगला) फार जास्त वापरू लागलो तर डावी नाडी (इडा) फार भारली जाते व बाजूचे हे चक्र आहे ते तुटते आणि आपल्यातल्या त्या त्या चक्रावरच्या देवता आहेत त्या एकतर झोपी जातात किंवा कधी कधी लुप्तही होतात त्यानंतर ती बाजू (इडा किंवा पिंगला जी जास्त भारलेली असते ती) आपोआप चालू लागते व त्यामुळे कॅन्सरचा रोग होऊ शकतो. तर कोणत्याही गोष्टींनी तुमची सिम्पथॅटिक नर्व्हस सिस्टीम जास्त उत्तेजीत होता कामा नये. तसेच खोटे गुरु केल्यामुळे किंवा काळ्या विद्येमुळे होतात आश्चर्याची गोष्ट आहे की, कॅन्सरच्या मागे कोणत्या ना कोणत्या गुरुचा प्रकार असतो. म्हणजे किती तरी प्रकारचे गुरु आहेत. ह्यावरून आपल्या लक्षात येईल. आजपर्यंत मी जितक्या केसेस ठीक केल्या आहेत, त्या सगळ्यांच्यामध्ये एक तर गुरुंचा प्रकार होता; किंवा त्यात काहीतरी काळ्या विद्येचा प्रकार आहे म्हणजे ही जी कॅन्सरची शक्ती आहे ती डावीकडून सुरु होते आणि डावीकडे डॉक्टर जाऊ शकत नाहीत, त्यांनी फार तर मान कापावी, नाक कापावे, डोळे कापावे, पण कॅन्सर मात्र ते ठीक करू शकत नाहीत.

आता जी मधली शक्ती आहे तिला विष्णुशक्ती म्हणतात, ह्या शक्तीबद्दल मला नाही वाटत की एवढ्या थोड्या वेळात मला सांगता येईल.

तेव्हा ह्या शक्तीबद्दल मी उद्या सांगेन आणि ह्याच शक्तीचे दमावर आपण सहजयोग पटवून घेतलेला आहे. जर ह्या दोनच शक्त्या नसत्या तर आपले इव्हॉल्युशन झाले नसते आपण ॲमीबाचे मानव झालो नसतो, व आज ह्या स्थितीला आलो नसतो की आपण सहजयोगामध्ये येऊन त्या परमस्थितिला प्राप्त झालो नसतो. परमेश्वर आपणांस सुखी ठेवो असा माझा आशिर्वाद आहे.